# काव्यरूप

# भगवद्‌गीता



प्रभाकर ठोसर

# काव्यरूप

# भगवद्गीता

प्रभाकर ठोसर

# पूर्वरंग

कुरूवंशातील भरत राजाचे वंशज धृतराष्ट्र व पांडू हे दोन बंधू होते. वडिल बंधू धृतराष्ट्र जन्मांध असल्यामुळे राज्यपद धाकटा बंधू पांडूला मिळाले. पांडूच्या अकाली निधनामुळे त्याचे पाच पुत्र युधिष्ठिर, भीम, अर्जुन, नकुल व सहदेव यांचे पालन-पोषण थोरला बंधू धृतराष्ट्र, याने केले. पांडूपुत्र व धृतराष्ट्रपुत्र एकाच ठिकाणी वाढले. क्षत्रिय विद्येत गुरूद्रोणाचार्यांनी दोघांनाही पारंगत केले. पितामह भिष्माचार्यांचे त्यांना सतत मार्गदर्शन लाभले.

परंतु दूर्योधनासह धृतराष्ट्रपुत्र पांडवांचा द्वेष करायचे. आपल्या पुत्रांनाच राज्य मिळावे अशी अंध धृतराष्ट्राची सुप्त खल इच्छा होती. म्हणून धृतराष्ट्राने पांडवांची हत्या करण्याचे कपट-कारस्थान रचले. परंतु मामेभाऊ श्रीकृष्ण व काका विदुर यांच्या आशिर्वादानें ते वाचले.

पांडवांची माता कुंती किंवा पृथा, भगवान श्रीकृष्णांची मामी होती. पांडव सदाचरणी असल्यामुळे भगवान श्रीकृष्ण नेहमी त्यांचा म्हणजे सत्याचा पक्ष घेत. आपली मनीषा फलद्रुप करण्यासाठी पूर्वरचित कट असफल झाल्यामुळे दुर्योधनाने पांडवांना द्युत क्रिडेचे आव्हान दिले. पांडवांनी ते आव्हान स्वीकारले. त्या द्युतक्रिडेत दुष्ट दुर्योधनाने पांडवपत्नी द्रौपदीस द्युतात जिंकले व तिला भरसभेत सर्वांसमक्ष वस्त्रहीन करून अपमानित करण्याचा प्रयत्न केला. परंतु भगवान श्रीकृष्णांच्या दिव्य आशिर्वादाने तो प्रसंग टळला. अखेरीरा दुर्योधनाने पांडवांचे राज्य हिरावून घेतले व त्यांना तेरा वर्षे वनवासात धाडले.

वनवास संपवून पांडव हस्तीनापूरात परत आले व त्यांनी दुर्योधनाकडे आपले अर्धे राज्य मागितले. परंतु दुर्योधनाने त्यांची मागणी पार धुडकावून लावली. निदान पाच गांवेतरी मिळावी म्हणून पांडवांनी विनंती केली. परंतु उध्दट दुर्योधनाने तिही विनंती फेटाळून सांगितले की पाच गावेच काय पण सुईच्या अग्राएवढीही भूमी मिळणार नाही.

आता मात्र पांडवांची सहिष्णुता संपुष्टात आली व आपला न्याय्य हक्क प्रस्थापित करण्यासाठी युध्द करणे क्रमप्राप्त झाले. युध्दासाठी जगातले काही राजे कौरवांना सामिल झाले तर काही पांडवांच्या बाजूने उभे राहिले. परंतु युध्द टळावे म्हणून श्रीकृष्णांनी दुर्योधनाकडे जाऊन सलोख्याचा सल्ला दिला. यालाच "कृष्ण-शिष्टाई" म्हणतात. परंतु प्रत्यक्ष श्रीकृष्णांचाही सल्ला धुडकावण्यात आला. तेंव्हा युध्दाशिवाय पर्याय राहिला नाही. श्रीकृष्ण स्वतः युध्दात उतरणार नव्हते. परंतु ज्या पक्षाला

त्यांचे सैन्य हवे असेल त्याने त्यांचे सैन्य घ्यावे व ज्याला स्वतः श्रीकृष्ण पाहिजे असतील त्याच्या बाजूने ते स्वतः उभे राहण्यास तयार होते. कौरवांच्या इच्छेप्रमाणे त्यांना श्रीकृष्णांचे सैन्य मिळाले व पांडवांना त्यांच्या इच्छेप्रमाणे स्वतः भगवान श्रीकृष्ण लाभले. श्रीकृष्णांनी अर्जुनाचे सारथ्य करण्याचे ठरविले.

कुरूक्षेत्रावर हिरण्वती नदीच्या एका तीरावर पांडवसेना ठाकली. तर दुसऱ्या बाजूला कौरवसेना सिध्द होती. पितामह भिष्मांना वास्तविक दोन्ही बाजू सारख्याच होत्या. परंतु दुर्योधनाचे दास्य स्वीकारल्यामुळे त्याच्या विनंतीनुसार कौरवसेनेचे अधिपत्य स्वीकारण्याखेरीज त्यांना गत्यंतर नव्हते.

इकडे हस्तीनापुरात फारच चलबिचल माजली होती. धृतराष्ट्राला युध्दही नको होते व पांडवांना राज्यही द्यायचे नव्हते. पण आता युध्दाशिवाय पर्याय नव्हता. परंतु कुरूक्षेत्रावर काय चालले आहे हे निदान प्रत्यक्ष पाहता यावे म्हणून दिव्यदृष्टीसाठी त्याने व्यास महर्षींना विनंती केली. आप्त-स्वकीयांचे मृत्यु व इतर दुःखद प्रसंग तुझ्याने पाहवणार नाहीत हा व्यास मुनींचा सल्ला धृतराष्ट्रास पटला. परंतु अशी दिव्य दृष्टी माझे ऐवजी संजयास देण्याची इच्छा त्यानें प्रकट केली. व्यास मूनींनी संजयाचे मस्तकावर हात ठेवून, "तथास्तु" म्हटले. तत्क्षणी संजयास दिव्यदृष्टीलाभ होऊन कुरूक्षेत्रावरील सर्व दृष्य दिसू लागले. त्या दृष्टीच्या आधारे संजयाच्या माध्यमातून कुरूक्षेत्रावरील सर्व घटना धृतराष्ट्र जाणून घेऊ इच्छित होता. म्हणून तो संजयास प्रश्न करता झाला. इथेच भगवद्‌गीतेचा शुभारंभ होतो.

*********

## संक्षिप्त गीतासार

सर्व उपनिषदांचे सार, महाभारतातील ज्ञानामृत म्हणजेच गीतोपनिषद किंवा भगवद्गीता होय. प्रत्यक्ष भगवंताचे मुखातून श्रीकृष्णार्जुन संवाद रूपाने या दिव्य उपदेशामृताचा उगम झाला आणि महर्षी व्यासांनी तो ग्रंथरत्न महाभारतात प्रथित केला.

भगवद्गीतेत प्रामुख्यानें संनातन-धर्म तत्वे वर्णन केली आहेत. सनातन म्हणजे शाश्वत किंवा एखाद्या गोष्टीचे अविभाज्य, स्वाभाविक, त्रिकालाबाधीत, सर्वव्यापी, अपरिवर्तनीय अंग होय. जसे, उष्णता व प्रकाश हे अग्नीचे गुण किंवा पाण्याची द्रवरूपता ही सनातन तत्वे आहेत. संप्रदाय म्हणजे एका विशिष्ट जीवनपध्दतीवरील विश्वास अथवा श्रध्दा, सनातन धर्माहून भिन्न आहे. विश्वास किंवा श्रध्दा अनित्य असल्यामुळे बदलू शकतात. अन्य संप्रदायाचा स्वीकार करता येतो. सनातन-धर्म किंवा तत्वे शाश्वत व अपरिवर्तनीय आहेत. म्हणून भगवद्गीतेकडे एक सांप्रदायीक ग्रंथ, या मर्यादित दृष्टीनें न पाहता तो एक सर्वव्यापी, शाश्वत संदेश आहे हे जाणून घेतले पाहिजे.

ईश्वर, जीव, प्रकृती, काळ ही चार शाश्वत तत्वे व पाचवे अशाश्वत कर्म तत्व, या मूलभूत तत्वांविषयी ज्ञान हा भगवद्गीतेचा आशय आहे. परमेश्वर नियंत्रित सत्व, रज, तमोगुणयुक्त भौतिक प्रकृती व त्या पलिकडे शाश्वत काळतत्व आहे. हे त्रयोगुण व शाश्वत काळ यांच्या संयोगाने कालानुरूप जी कार्ये घडतात त्यांना "कर्म" म्हणतात. कर्म हे पाचवे तत्व अनित्य असल्यामुळे आपल्या कर्मानुसार आपल्याला इष्ट, अनिष्ट वा मिश्रित फलप्राप्ती होते. परंतु कोणते कर्म केले असता आपण मुक्त होऊ शकतो हे पूर्णज्ञानांती जांणून आपण कर्मफलात बदल घडवून आणू शकतो.

भगवद्गीतेतील पहिल्या सहा अध्यायांत इच्छा, कामना किंवा आसक्ती संबधी विवेचन केले आहे. पुढील सहा अध्यायांत परम ईश्वर प्रीतिची प्रेरणा विषद केली आहे व अखेरच्या सहा अध्यायांत सुप्तबुध्दी जागृती व ज्ञान वर्णन केले आहे. या तिन्ही अंगाचा एकत्रित विकास मनुष्याला पूर्णत्वास नेतो. योगमार्गाने सिध्दीप्राप्तीसाठी प्राकृतीक पातळीवर कर्मयोग, मानसिक पातळीवर भक्तीयोग, बौध्दिक पातळीवर ज्ञानयोग व आध्यात्मिक पातळीवर ध्यानयोग उपदेशिले आहेत. परंतु सर्वत्र सात्विकता तसेच चित्त-शुध्दी, समत्व, स्थिरता, विरक्तता, अनिवार्य आहे. सत्य-असत्य, सुख-दुःख, जन्म-मृत्यु, कर्म-अकर्म, मोह-निर्मोह, काम-क्रोध, इष्ट-अनिष्ट यातील अविरत संघर्षावर विजय प्राप्त करून बावनकशी अक्षय ब्रह्मसत्याच्या प्रत्ययाद्वारे मानव जातीचा उध्दार करणे हा गीतेचा उद्देश आहे.

सद्य परिस्थितीत आपली चेतना भौतिक गुणांमुळे निकोप राहिली नाही. भगवद्गीता आपल्याला आपल्या कार्याचे शुध्दीकरण करण्यास शिकविते. भगवद्गीतेचा अभ्यास मानवास मार्गदर्शक व लाभदायक आहे. दिव्यत्वाने प्रेरित ज्ञात्यावर चिरस्थायी बौध्दिक व भौतिक उत्पादकता आपोआप गतिमान होते. भगवद्गीतेत चैतन्याचा, प्रेरणेचा, शक्तिस्थानांचा, अनन्यसाधारण, अलौकिक आणि अमोघ अखंड स्त्रोत आहे. सामान्य व्यक्तीसुध्दा या ज्ञानाने असामान्यत्व प्राप्त करू शकते. भगवद्गीता म्हणजे चातुर्याचा, धीरोदात्ततेचा, दिव्य प्रेरणेचा, कार्यप्रवणतेचा आणि विश्वासक नायकत्वाचा त्रिकालाबाधित व्यवहार्य संदेश आह. जीवनातील सर्व सुख-दुःखें, चिंता व भय यांचे निराकरण करून कृतार्थ जीवनलाभ प्रदान करणे हेच भगवद्गीतेचे सार-सर्वस्व म्हणता येईल.

*********

# मनोगत

भगवद्गीता क्लिष्ट व आपल्या आवाक्याबाहेर आहे या ठाम समजूतीमुळे आभ्यासात्मक दृष्टीने भगवद्गीतेकडे वळण्याचे पूर्वी कधी धाडसच केले नव्हते. परंतु विधिलिखीत काही वगळेच होते.

श्री. नारायण गुरूजींच्या प्रेरणेनें व सतत प्रोत्साहनाने आरंभी दबकतच काव्यानुवादाच्या या शिवधनुष्याला हात घालण्याचा संकल्प तर केला. सुरवातीला पहिले दोन अध्याय फार उत्साहाने पुरे केले. नंतर काही दिवस असेच गेले. गाडी पुढे सरकतच नव्हती. एके दिवशी ध्यानमग्न बसलो व सखोल विचार केला. तेंव्हा लक्षात आले की अढळ निष्ठेशिवाय हे पुण्य-कर्म होणे नाही. मग मात्र या काव्यानुवादाचा ध्यासच घेतला. "गुणी गुणं वेत्ती, न वेत्ती निर्गुणः" या उक्तीप्रमाणे सतत श्री.नारायण गुरूजींची प्रगती बद्दल विचारणा व दाद मिळत राहिल्यामुळे उत्साह वृध्दिंगत होऊन आत्म-विश्र्वास वाढत गेला.

असे म्हणतात की देव त्यांनाच मदत करतो जे आत्म-निर्भर असतात. भारतीय मुल्यांवरची नितांत श्रध्दा तसेच सुप्त सृजनशीलतेला आवाहन करून आत्मशक्तीचा विकास व संवर्धन करण्याच्या माझ्या तळमळीला स्वामी नारायणाच्या कृपा-प्रसादाची जोड मिळाल्यामुळे रात्रं-दिवस अविरत दंग होऊन हे कार्य संपन्न झाल्याचे अलौकिक समाधान वाटते.

असे कार्य आपल्या हातून घडेल अशी पुसटशी कल्पनाही कधी मनास शिवली नव्हती. परंतु श्री. नारायण गुरूजींच्या निखळ प्रेमाशिर्वादाने एका पाठोपाठ एक असे प्रगती सोपान चढत गेलो. त्यांच्याच प्रोत्साहनाने "श्रेष्ठतेचा सोपान", "उचित परिपूर्ण व्यवस्थापन", "अवलंबनाकडून मुक्तीकडे", "गीतोक्त नेतृत्व दर्शन" नंतर हे पाचवे पुष्प साकार झाले. गुरूपौर्णिमेच्या शुभदिनी हा लेखनप्रपंच श्री.नारायण गुरूजींना अर्पण करण्यात धन्यता वाटते.

हे कार्य करित असताना आमची कार्यालयीन सहकारी सौ.ऋतुजा परांजपे हिची अजोड व तत्पर साथ मिळत राहिली हे आवर्जुन आभारपूर्वक नमूद करावेसे वाटते.

हा लेखन प्रपंच वाचकांना सुलभ व उद्बोधक ठरेल असा विश्र्वास वाटतो.

प्रभाकर ठोसर

गुरू पौर्णिमा
जुलै २८, १९९९
विलेपार्ले,
मुबई ४०० ०५७.

## गणेश-वंदन

आधी वंदून तव पाया।
तुला प्रार्थितो गणराया।
लाभूदे मज तव माया।
गीता-गान सिध्द कराया।

## व्यास-स्तुती

व्यास महर्षी, महाबुध्दीमंता।
तुम्हास माझा प्रणिपात आता।
ग्रथिली तुम्ही महाभारती गीता।
ज्ञान-दीप तो सदैव उजळी जगता।

## गीता-ध्यान

पार्थास कथिली स्वये अच्युते।
अठराध्यायी, गर्भित ज्ञानामृते।
हे प्रिय अंबे ! भगवते गीते।
तुला वंदितो गीताई माते।

# अनुक्रमणिका


| अध्याय | शिर्षक | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | अर्जुनविषाद योग | १-८ |
| २ | सांख्य योग | ९-२१ |
| ३ | कर्म योग | २२-२९ |
| ४ | ज्ञानकर्मसंन्यास योग | ३०-३६ |
| ५ | संन्यास योग | ३७-४१ |
| ६ | ध्यान योग | ४२-४९ |
| ७ | ज्ञानविज्ञान योग | ५०-५४ |
| ८ | अक्षरब्रह्म योग | ५५-५९ |
| ९ | राजविद्या राजगुह्य योग | ६०-६५ |
| १० | विभूती योग | ६६-७२ |
| ११ | विश्र्वरूपदर्शन योग | ७३-८२ |
| १२ | भक्ती योग | ८३-८६ |
| १३ | क्षेत्र क्षेत्रज्ञ विभाग योग | ८७-९२ |
| १४ | गुणत्रय विभाग योग | ९३-९७ |
| १५ | पुरूषोत्तम योग | ९८-१०१ |
| १६ | दैवासुर संपद्विभाग योग | १०२-१०५ |
| १७ | श्रध्दात्रय विभाग योग | १०६-११० |
| १८ | मोक्षसंन्यास योग | १११-१२२ |

## ।। अध्याय पहिला ।।

### *अर्जुनविषाद योग*

धृतराष्ट्र म्हणाला :

धर्म-कुरूक्षेत्र पावन स्थानी।
युध्दोच्छुक मम-पांडुसुतांनी।
काय केले एकत्र ठाकूनी।
मज सांग संजया त्या सर्वांनी।।१।।

संजय म्हणाला :

पांडवसेना विलोकून।
दूर्योधन आला धावून।
गुरू द्रोणांपाशी जाऊन।
वदला त्यांसी हे वचन।।२।।

मम आचार्य हे द्रोण !।
पांडवसेना घ्यावी निरखून।
शिष्य तुमचा दृपदनंदन।
रचिला त्याने व्यूह सावधान।।३।।

जमले येथे शूर रथी।
भीमार्जुनासम ख्याती।
विराट, युयुधानासाथी।
दृपद जैसे महारथी।।४।।

धृष्टकेतू, चेकितान।
काशिराज शक्तिमान।
पूरूजित, कुंतिभोजासमान।
नरवर शैब्य वीर्यवान।।५।।

युधामन्यु विक्रांत।
उत्तमौजा वीर्यवंत।
सौभद्र, द्रौपदीसुत धैर्यवंत।
महावीर सारे कीर्तीवंत।।६।।

सैन्यी आपुल्या उत्कृष्ट।
आम्हामध्ये सर्वश्रेष्ठ।
नामे त्यांची विशिष्ट।
सांगतो तुम्हा द्विजश्रेष्ठ।।७।।

आपण आणि भीष्म, कर्ण।
कृपाचार्य नीतिपूर्ण।
अश्र्वत्थामा, सोमदत्ती, विकीर्ण।
संगरी सारे परिपूर्ण।।८।।

आणिकही बहु शूर।
विविधायुधी लढणार।
ममकार्यी मरणार।
युध्दविषारद वीर।।९।।

बल आपुले अपरिमित।
पितामहे सुरक्षित।
भीमाद्वारे परि रक्षित।
पांडवशक्ती सीमित।।१०।।

सैन्यव्युहातील सर्वांनी।
उभे राहूनी निजस्थानी।
संरक्षावे चहु दिशांनी।
पितामहांना लक्षूनी।।११।।

मग कुरुवृध्दे वीर्यवान।
दूर्यो[illegible] म्हणून।
केला सिंहगर्जनेसमान।
शंखनाद तो महान।।१२।।

शंख, ढोल, तुतारी।
नगारे, रणशिंगे, भेरी।
एकत्र वाजता सारी।
दशदिशा हादरल्या भारी।।१३।।

श्वेतअश्व महारथी।
बैसले पांडव, श्रीपती।
दिव्य शंख घेऊन हाती।
महाघोष ते करिताती।।१४।।

पांचजन्य दामोदरे।
देवदत्त धनुर्धरे।
पौण्ड्र तो वृकोदरे।
शंख गर्जिले सारे।।१५।।

अनंतविजयाचा गजर।
करिते झाले युधिष्ठिर।
सुघोष मणिपूष्पकाचा गजर।
नकुलसहदेव करिती वीर।।१६।।

काशीराज धनुर्धर।
विराट, शिखण्डी थोर।
धृष्टद्युम्न महावीर।
अजिंक्य सात्यकी वीर।।१७।।

द्रौपदीसुत, पांचालनृपाले।
समस्त तद्वत महिपाले।
आणिक अभिमन्यु महाबले।
जलज फुंकीले वेगळाले।।१८।।

प्रलयंकारी शंखध्वनी।
दुमदूमली नभ अवनी।
मनी भयकंपीत होऊनी।
कौरव झाले विध्द मनी।।१९।।

पाहूनी कौरव सुस्थित।
अर्जुने आपुल्या रथात।
करण्या शस्त्रसंपात।
चापी घातला हात।।२०।।

अर्जुन म्हणाला :

पार्थ करूनी संकेत।
वदला, हे अच्युत !।
चला घेऊनी माझा रथ।
द्विसैन्य मध्यात।।२१।।

निज शस्त्रांसहित।
झाले येथे उपस्थित।
पाहिन मी ते युध्दप्रेरित।
लढणे मज ज्यांसी या रणांत।।२२।।

पाहूदें मज हे अनिरूध्द !।
कौरवकैवारीं बध्द।
इथे जाहले सिध्द।
मजप्रति छेडण्या युध्द।।२३।।

संजय म्हणाला :

इति वदता अर्जुन।
हृषीकेशे रथ महान।
उभय सैन्यांत नेऊन।
मधोमध केला स्थापन।।२४।।

भीष्म तसेच द्रोण।
सकल राजे मिळून।
कौरवांसी घे पाहून।
पार्था वदले भगवान।।२५।।

नजर टाकीता सर्वत्र।
पार्था दिसले श्वशुर, गुरू, भ्रात्र।
सोयरे, मातुल, पुत्रपौत्र।
आणिक तसेच निजमित्र।।२६।।

सकल आप्तांसी पाहून।
करूणाविव्हल झाले मन।
शोकाकुल मग होऊन।
वदता झाला अर्जुन।।२७।।

अर्जुन म्हणाला :

युध्दोत्सुक ते स्वजन।
पाहूनी इथे, हे प्रद्युम्न !।
मुखी शुष्कता येऊन।
कंप पावते माझे तन।।२८।।

गाण्डीव जातसे गळून।
वाटे अंग जाई जळून।
शरीर कंप पावून।
सर्वांग गेले रोमांचून।।२९।।

झाले मन माझे भ्रमिष्ट।
होतसे जागृती नष्ट।
दिसती चिन्हें अनिष्ट।
उभे राहण्या अति कष्ट।।३०।।

वधूनी स्वजनांस युध्दात।
मज न दिसे हित काही त्यात।
नच मी विजय काही इच्छित।
राज्यसुखही नुरले मम इप्सित।।३१।।

राज्यसुख ते नको मला केशवा।
कोणासाठी लढावयाचा लढा असा कडवा ?।
मला न वाटे ऐहिकातही किंचितसा गोडवा।
अर्थशून्य हे जीवीत भासे मला आता माधवा।।३२।।

ज्यांचे व्हावे कल्याण।
राज्यभोगेच्छा म्हणून।
तेच ठाकले युध्दाकारण।
त्यागूनी आपुले धन प्राण।।३३।।

पुत्र, वडिल, गुरूजन।
आजे, सासरे, महा-जन।
मामे, नातु, मेहूणे स्व-जन।
तसेच आणि प्रिय-जन।।३४।।

नच केवळ भूवन।
जरी मिळाले त्रिभूवन।
स्वहस्ते यांसी न मारिन।
मेलो जरी त्यांचे हातून।।३५।।

धृतराष्ट्रपुत्रांसी मारून।
[illegible] समाधान।
आततायींसी या वधून।
भाळी आमुच्या पापलांछन।।३६।।

म्हणून मारणे आप्तेष्ट।
नाही माधवा इष्ट।
स्वजनवध कर्मदूष्ट।
करील न आम्हा कधी तुष्ट।।३७।।

कुलनाशी कूकर्म।
मित्रद्रोही पापकर्म।
दिसतो न यांसी अधर्म।
अतिलोभ यांचा धर्म।।३८।।

परिवाराचे हनन।
अपराध तो दारूण।
पातक होते पाहून।
का, न शिकावे आपण ?।।३९।।

कुल जाता लयास।
कुलाचार पावे ऱ्हास।
उरती जे वारस।
कवटाळीती अधर्मास।।४०।।

अधर्म माजता, हे नारायण !।
कुलस्त्रिया जाती बिघडून।
नारीजात होता पतन।
उपजे अवांछित संतान।।४१।।

वर्णसंकरातुन, हे नारायण ! ।
कुलघ्न जाती नरकी आपण।
लोप पावता पिंड जलार्पण।
पतन पावतो सर्व पितरगण।।४२।।

आचार वर्णसंकरग्रस्त।
कुलघ्नांचा दोष हा समस्त।
म्हणून होती कुळाचार अस्त।
जातीधर्म आणिक उध्वस्त।।४३।।

कुळाचार ज्यांचे लोपले।
सदा नरकवासी ते झाले।
गुरुशिष्य परंपरेतून आले।
श्री हरि, मी ते परिसले।।४४।।

राज्यभोगलोभे सुखकर।
स्वजनांस मी वधणार।
महापाप हे किती भयंकर।
सिध्द जाहलो करण्या तत्पर।।४५।।

करण्यासाठी प्रतिकार।
शस्त्र न हाती धरणार।
मारिले जरि मज ठार।
होईल माझा उध्दार।।४६।।

संजय म्हणाला :

असे वदला अर्जुन रणी।
शरचाप टाकीला आणि।
शोकविव्हल होऊन मनी।
बैसला आपुल्या रथासनी।।४७।।

**अध्याय १ संपन्न**

## ।। अध्याय दुसरा ।।

### *सांख्य योग*

संजय म्हणाला :

करूणामय विव्हल मन।
नयनी आले अश्रू दाटून।
पाहूनी असा तो अर्जुन।
वदले त्यासी भगवान।।१।।

श्री भगवान म्हणाले :

समयी अशा विपरीत।
काय सुचे तुज आक्रीत।
थोरजना नच उचित।
दुष्कीर्तीस जे कारणीभूत।।२।।

नको धरू षंढतेची कास।
शोभे न जे तुझेसारख्यास।
सोडून या दूबळेपणास।
उभा रहा तू युध्दास।।३।।

अर्जुन म्हणाला :

आम्हास जे पूजनीय।
भीष्म, द्रोण वडिलद्वय।
शर सोडू कसे मी काय ?।
सांगा मज, हे वार्ष्णेय ?।।४।।

वधण्यापरी थोर गुरूजन।
जगणे उचित भिक्षा मागून।
इच्छा त्यांची जरी असे धन।
वडील परी ते आम्हालागून।
केले त्यांचे जर मी हनन।
भोग जातील मम रक्ताळून।।५।।

त्यांचेवरी जय वा त्यांचे हातून पराजय।
कळे न मज उचित उभयांतील ते काय।
वधूनी यांसी निरर्थक जगणे मज होय।
उभे परि ते रणी या करूनी युध्दाचा निश्चय।।६।।

दिङ्मूढ झालो, मनःशांती पावली नाश।
स्थितीस अशा या कारण स्वभावदोष।
शरण आलो तुम्हास, मी तुमचा शिष्य।
अशा अवस्थी काय योग्य तो सांगा उपदेश।।७।।

मम इंद्रियांचा जो महाशोषक।
उपाय न दिसे शमविण्यास तो शोक।
अधिराज्य जरि मिळाले, जसा देवलोक।
असाध्य आहे तरी मजसी तो निवारणे शोक।।८।।

संजय म्हणाला :

असे बोलुन अर्जुन।
हृषीकेशा उद्देशून।
"लढणार नाही" सांगून।
स्तब्ध राहिला बसून।।९।।

सविषाद पार्था पाहून।
सैन्यद्वयांत उभे राहून।
हृषीकेश तेंव्हा हसून।
वदले त्यासी हे वचन।।१०।।

श्री भगवान म्हणाले :

अयोग्याचा करिसी शोक।
सुजाण बोलणे परि देख।
गतागताचा करिती न शोक।
कदापिहि जे ज्ञानीलोक।।११।।

नव्हता असा कधी काळ।
नव्हतो मी, तू, भूपाळ।
संपलो आपण सकळ।
होणे नाही कधी काळ।।१२।।

शैशव, यौवन आणि जरा।
चक्रातून या देहाचा फेरा।
आत्म्यास लाभे तसा देह दूसरा।
स्थित्यंतर हे कधी न मोही धीरा।।१३।।

विषय जे इंद्रियांचे प्राण।
देती सुखदुःखे शीतोष्ण।
येती, जाती ही त्यांची खूण।
शांतचित्ते सोसावी जाण।।१४।।

जया सुखदुःखी अनासक्ती।
विषयपीडा तया न होती।
अविचल ज्याची सदा स्थिती।
मोक्षपदाची तया निश्चिती।।१५।।

लटिके आहे अशाश्वत।
सत्य परि ते शाश्वत।
द्विरूप दिसे दोन्हींत।
निष्कर्ष काढती पंडीत।।१६।।

सर्व चराचरी ज्याचा वास।
त्या तत्वाचा कधी नाही ऱ्हास।
अशक्य त्याचा नाशही कोणास।
जन्ममृत्युही कधी नाही त्यास।।१७।।

शरीर भौतिक नाशवंत।
जीवात्म्यास नसे परि अंत।
जाणून घे हा विचार धीमंत।
लढ तू आता, नको करू खंत।।१८।।

एक वदे, हा मारितो।
दुजा वदे, हा मरतो।
उमजे न दोघा जीवात्मा तो।
हा न मारी, वा मरतो।।१९।।

कधी न यासी जन्ममरण।
नाही यासी त्रिकालबंधन।
अजन्मा हा नित्य सनातन।
हा शाश्वत आणि पुरातन।
देह जाहला जरी अचेतन।
नाशमुक्त हा असे चिरंतन।।२०।।

आत्मा अविनाशी शाश्वत।
अजन्मा आणि क्षयरहित।
तो न कोणा मारी व मारवित।
विवेक पुरूषा सकल हे ज्ञात।।२१।।

देतो नर जीर्ण वस्त्रे टाकून।
नवी वेगळी करितो परिधान।
जीवात्माही देह जर्जर त्यागून।
प्रवेश करतो अन्य देही नवीन।।२२।।

शस्त्रे न यासी छेदीत।
अग्नि न यासी जाळीत।
जल न यासी भिजावेत।
वायु न यासी सुकवित।।२३।।

ना तुटतो हा, ना जळतो।
ना भिजतो, वा, ना सुकतो।
नित्य चराचरी हा वसतो।
शाश्वत आणि स्थिर असतो।।२४।।

अव्यक्त, अचिंत्य, अविकारी।
म्हणती यासी या परी।
जाणून हे तू आतातरी।
आवरी आपुला शोक सत्वरी।।२५।।

जन्मा येतो हा नित्य।
मृत्यु पावतो हा नित्य।
ज्ञात जरी हे तुज सत्य।
शोकात ना या तरी तथ्य।।२६।।

जन्मला तो मृत्युपंथे जाता।
जन्म त्याचा पुन्हा सर्वथा।
अटळता ही जाणून आता।
सोडून देई शोक वृथा।।२७।।

जीव आरंभी अव्यक्त।
मध्यावस्थी परि व्यक्त।
पुनश्च अंति अव्यक्त।
शोक म्हणून हा नच युक्त।।२८।।

कोणी यासी बघती "आश्र्चर्य" म्हणून।
"अद्भूत" म्हणूनी कोणी करिती वर्णन।
अन्य करिती "अलौकिक" म्हणूनी श्रवण।
त्यांस न होई तरी त्या आत्म्याचे ज्ञान।।२९।।

नित्य वसतो सर्वाठायी।
कधी न तो वधला जाई।
म्हणून कोणा जीवापायी।
शोक हा तुझा अनाठायी।।३०।।

स्वधर्माची धरी तू कास।
नको थारा युध्दभयास।
धर्मयुध्दाविण क्षत्रियास।
काय नेईल श्रेयास ? ।।३१।।

दैवे चालुन येता समर।
क्षत्रिय सुखी ते खरोखर।
संधीने या उघडे अपार।
यत्नाखेरीज स्वर्गाचे दार।।३२।।

कर्तव्य आपुले सोडून।
धर्मयुध्द स्वये टाळून।
भाळी येऊन पापलांछन।
लयास जाईल तव मान।।३३।।

तव अपयशाचे वर्णन।
करतील जन गर्जून।
ख्यात पुरूषालागून।
दुष्कीर्ती अधिक मृत्युहून।।३४।।

रणभयास्तव माघारी फिरला।
मानील असे जो माघारी उरला।
महारथींनी मान तुला दिधला।
तुच्छ लेखतील तेच आता तुजला।।३५।।

योग्यता असुनी तव थोर।
निंदतील शत्रू तुज फार।
भलतेच बोलतील स्वैर।
दुःखद याहून काय असणार ?।।३६।।

मरण येता रणभूमीवर।
स्वर्गप्राप्ती तुजला नरवर।
भूपती होशील तू विजयोत्तर।
उठ म्हणून तू युध्दा सत्वर।।३७।।

सुख दुःख लाभ नुकसान।
जय-पराजय सम लेखून।
युध्दास सिध्द हो युध्द म्हणून।
यांत न काही पातक तुजलागून।।३८।।

विषद केले सांख्यज्ञान।
ऐक, पार्था ! आता सावधान।
वर्णितो तुज बुध्दियोग ज्ञान।
मुक्त करी जे कर्मबंधनातून।।३९।।

या मार्गी ना हानी काही।
तसेच काही विघ्नही नाही।
धर्माचरण ते स्वल्पही।
महाभयातून तारून नेई।।४०।।

मार्ग हा जे आचरती।
ध्येय, बुध्दीनें दृढ असती।
डळमळीत असे ज्यांची वृत्ती।
वाटा फोडी अनंत ती।।४१।।

अल्पज्ञ लोक जे असती।
वेदवादी ते रस घेती।
पुष्पित वचनें बोलती।
वेदाविण अन्य नसे म्हणती।।४२।।

ऐश्वर्यभोगसक्त जे असती।
जीवीतध्येयी स्वर्गसुख शोधती।
या इच्छेनें सदा आचरती।
इंद्रियसुख ते उपभोगती।।४३।।

भोगवैभवा जे भुलती।
त्यांत सदा ते गुंगती।
भरकटलेली सदा मती।
मग न उरते कार्यनिश्चिती।।४४।।

वेद सांगती त्रिगुण।
पार्था हो तू निर्गुण।
करूनी कर्मफल तर्पण।
हो तू सत्वशील आपण।।४५।।

कूप करी जी सान सानुली काजे।
महाजलाशय करितो ती सहजे।
गहन वेदार्थ ज्यास उमजे।
वेदकार्य तोहि करी तेवीजे।।४६।।

निजकर्माचा तू अधिकारी।
नाही पण तू फलाधिकारी।
फलासक्ती न धरी अंतरी।
निज कर्माचा मार्ग अनुसरी।।४७।।

योगस्थ राहूनी कार्य करावे।
फलासक्ती विरहित व्हावे।
यशापयशा लेखूनी समभावे।
योग मर्म हे जाणून घ्यावे।।४८।।

समत्वबुध्दीचे आचरण।
निंद्यकर्माहून थोर जाण।
फालसक्ती ठेविती कृपण।
समत्वबुध्दीस म्हणून जा शरण।।४९।।

समत्वबुध्दीनें जे युक्त।
कर्म-कूकर्मातून मुक्त।
म्हणून हो तू योगयुक्त।
योगकर्म ते कलायुक्त।।५०।।

बुध्दीयोगी, ज्ञानी जन।
फलवासना भेदून।
जन्मबंधनें तोडून।
पावती दुःखमुक्त स्थान।।५१।।

मोहमाया लंघून।
जाईल जेंव्हा तुझे मन।
श्रुतश्रोतव्या लागून।
होशील तू उदासीन।।५२।।

मतमतांच्या कल्लोळात।
तव मती झाली भ्रमित।
अचल होता समाधीत।
होशील तेंव्हा योगस्थ।।५३।।

<u>अर्जुन म्हणाला :</u>

अर्जुन म्हणे हे कृष्ण !।
स्थितप्रज्ञाचे सांगा लक्षण?।
कसा चाले, कसे वर्तन?।
आणिक त्याचे भाषण?।।५४।।

<u>श्री भगवान म्हणाले :</u>

देव म्हणे हे अर्जुन !।
वासनाहीन ज्याचे मन।
वसे निजांतरी समाधान।
तो एक स्थितप्रज्ञ जाण।।५५।।

दुःखी न जाई खचूनी।
सुखी न जाई हर्षुनी।
क्रोध, भयी अचल मनी।
म्हणती त्यासी स्थिर मुनी।।५६।।

शुभासंगे हर्ष नसे।
अशुभासंगे खेद नसे।
स्तुत्य काही वा निंद्य नसे।
प्रज्ञा त्याची स्थिर असे।।५७।।

कूर्म आपुले अंग ओढीतो।
कवचाखाली नीट दुमडीतो।
इंद्रियांस जो तसे आवरितो।
दृढपूर्वक तो स्थिर होतो।।५८।।

विषयवासना साधक सोडी।
तरीही आतील सुटे न गोडी।
विषयरसावर करी कडी।
ब्रह्मज्ञान जो नर जोडी।।५९।।

पुरूष विवेकी असून।
यत्न करीतो विलक्षण।
तरीही गात्रे खेचून।
ओढती त्याचे मन।।६०।।

इंद्रियां ठेवून अंकित।
करून आणि संयमीत।
ममठायी जो श्रध्दायुक्त।
त्यास स्थिरमती म्हणतात।।६१।।

करिता विषयांची आठवण।
विषयी चित्त होई रममाण।
विषयासंगे काम निर्माण।
कामासंगे क्रोधागमन जाण।।६२।।

क्रोधातून फुटे मोहांश।
मोहातुन उठे स्मृतीभ्रंश।
स्मृतीभ्रंशातून बुध्दिनाश।
बुध्दिनाशे सर्वनाश।।६३।।

रागद्वेषास वर्जून।
इंद्रियां स्वाधीन ठेवून।
स्वामित्वे विषयी वर्तून।
नर पावे समाधान।।६४।।

समाधानी जो असा नर।
दुःखे त्याची पळती दूर।
प्रसन्न असता निजांतर।
शीघ्र पावते मती स्थिर।।६५।।

अयुक्तास बुध्दी न ध्यान।
विचलित त्याचे मन।
अशांती ध्यानावाचून।
अशांता सुख कोठून?।।६६।।

नाव भरकटे वायुनें सुसाट।
तशी इंद्रियें सुटती मोकाट।
चित्तही होता त्यासवे पिसाट।
अटळ असे मग बुध्दिचा शेवट।।६७।।

म्हणून हे कुरूनंदन !।
सकल विषयांपासून।
इंद्रिये ठेवितो स्वाधीन।
त्याचे होई स्थिर ज्ञान।।६८।।

सकळ जीवांची निशावेळ।
योग्यास तो जागृतीकाळ।
जागी जेंव्हा जीवजात सकळ।
मुनीश्र्वरा तो निशापळ।।६९।।

भरे सागरी जलौघ अव्याहत।
स्थान न लंघी, क्षोभरहित तो सदोदित।
स्थितप्रज्ञास ऋध्दिसिध्दि जरी प्राप्त।
मती तयाची कधी नाही चळत।
शांती मिळे त्यासी जो सदा अबाधित।
अशांती त्यासी, जो सदाही अतृप्त।।७०।।

सर्व कामना त्यागी तो।
मोह अहंता सोडी तो।
निस्पृह वर्तन ठेवी तो।
परमशांती मिळवी तो।।७१।।

ब्राह्मी स्थिती होता प्राप्त।
पुन्हा न होई मोहित।
अंतःकाळी असता स्थित।
विलीन होईल ब्रह्मात।।७२।।

**अध्याय २ संपन्न**

## ।। अध्याय तिसरा ।।

## *कर्म योग*

अर्जुन म्हणाला:

बुध्दि थोर कर्माहून।
तुम्हा वाटते मनोमन।
तर घोर हे कर्माचरण।
का सांगता मज आपण?।।१।।

संदिग्ध तुमच्या वचने।
मम मती भ्रमली मोहाने।
काय हितकर मी करणे।
सांगावे मज ठामपणे।।२।।

श्री भगवान म्हणाले:

प्रथम केले मी कथन।
जगी या, संप्रदाय दोन।
सांख्य तो ज्ञानयोग जाण।
योग तो कर्मयोग म्हणून।।३।।

केवळ राहून कर्महीन।
नाही मुक्ती कर्मबंधातून।
तसेच संन्यस्त राहून।
कधी न मिळे सिध्दिस्थान।।४।।

क्षण नसे कर्महीन।
प्रकृती स्वभाव म्हणून।
बळेच घडवी कर्मे जाण।
प्रकृती आपुल्या गुणाधिन।।५।।

कर्मेंद्रियें बळे रोखून।
अंतरी चाले भोग चिंतन।
लोका सांगे तत्त्वज्ञान।
मूढमती तो दांभिक जाण।।६।।

इंद्रियां ठेवून अंकित।
कार्य करवी विहित।
राही परी अनासक्त।
श्रेष्ठ नर तो योगयुक्त।।७।।

निष्कर्माहून कर्म बरवे।
कर्महीन तू कधी नसावे।
म्हणून तुझे तू कर्म करावे।
देहयात्रा कर्मेही संभवे।।८।।

कार्य करावे यज्ञा करिता।
निःसंग होऊनी सर्वथा।
विहित आपुले कर्म पाळीता।
कर्मबंधनातून मुक्तता।।९।।

यज्ञासह मानवांस निर्मून।
दिले विधिने त्यांना वरदान।
करिता तुम्ही यज्ञाचे पूजन।
इच्छापूर्ती होईल त्यापासून।।१०।।

भजता मनोभावे देवांस।
होतील प्रसन्न तुम्हास।
परस्परभावे सिध्दिस।
जाईल तुमची आस।।११।।

यज्ञे देव प्रसन्न होती।
इष्टभोग तुम्हास देती।
त्यांचे त्यांस न अर्पिती।
स्वयंभोगी ते चोरच असती।।१२।।

यज्ञोत्तर करिती अन्न सेवन।
त्यांचे होते सर्व पाप मोचन।
स्वनिमित्ते रांधिती जे भोजन।
पापच ते करिताती भक्षण।।१३।।

अन्नापासून भूतें जन्मती।
पर्जन्यातून अन्न निर्मिती।
यज्ञापासून धारा पडती।
कर्मापासून यज्ञोत्पत्ती।।१४।।

ब्रह्मापासून कर्म उपजले।
परब्रह्मातुन ब्रह्म प्रकटले।
परब्रह्मानें सर्व व्यापले।
म्हणून यज्ञी स्थित झाले।।१५।।

यज्ञचक्राचे पालन।
विषयासक्त करी न जाण।
होतो पापी तो म्हणून।
व्यर्थच त्याचे जीवन।।१६।।

नर असे जो आत्मप्रित।
आत्मानंदी आणि तृप्त।
निजस्वरूपी सदा रत।
कार्यमुक्त तो सदोदित।।१७।।

कर्म करणे वा ना करणे।
त्यास न काही देणे घेणे।
सकल भूतांकारणे।
अधिक त्यास ना उणे।।१८।।

कर्तव्य म्हणूनी निश्चित।
कर्म करावे जे विहित।
राहता स्वये अनासक्त।
होतसे ब्रह्मपद प्राप्त।।१९।।

नियत कर्मे करूनी केवळ।
सिध्दि पावले जनकादी नृपाळ।
लोकबोधार्थ म्हणूनी सकळ।
कर आपुले कर्म सदाकाळ।।२०।।

थोर जे जे आचरति।
इतरेजन धर्म मानिती।
प्रमाण जे जे ते करिती।
जन तसेच अनुचरति।।२१।।

त्रिभूवनी मज काही।
कर्म करणे नाही।
नसता स्वार्थ हेतुही।
कर्मी रत मी तू पाही।।२२।।

विहित कर्म पालन।
मी न करिता, हे अर्जुन !।
सर्व जन मग निक्षून।
तसे करतील वर्तन।।२३।।

झालो जर मी कर्महीन।
नष्ट होईल जनजीवन।
संकर करूनी उत्पन्न।
घातास कारण होईन।।२४।।

फलासक्तीत गुंतूनी।
कर्म करिती अज्ञानी।
जनहित केवळ इच्छुनी।
कर्म करावे सूज्ञांनी।।२५।।

अज्ञ असता कर्मसक्त।
त्यांस न करावे विरक्त।
सूज्ञें आचरूनी युक्त।
त्यांस करावे उद्युक्त।।२६।।

प्रकृतीगुणांच्या कारणे।
सकल कर्माचे घडणे।
असे असूनी मूढ म्हणे।
घडती ती मम कारणे।।२७।।

प्रकृतीस्वभावे मोहून।
मूर्ख होती विषयाधीन।
गुण-कर्म भेद जाणून।
ज्ञानी न पडती गुंतून।।२८।।

प्रकृतीगुणें भुलुनी।
विषयीं जाती गढूनी।
अल्पमती ते म्हणूनी।
चाळवू नये सूज्ञांनी।।२९।।

अध्यात्मबुध्दि ठेवून।
तव कर्म मज अर्पून।
निरिच्छ, निर्मम होऊन।
युध्दास उठ, हे अर्जुन!।।३०।।

द्वेषरहित होऊन।
मम आदेश पालन।
सश्रध्द करिती जे जन।
सुटती ते कर्मबंधातून।।३१।।

द्वेषभावे उपेक्षिती।
आणि अवज्ञा करिती।
ज्ञानी असोनी चेवती।
म्हणून होती भ्रष्टमती।।३२।।

आचार ज्ञानवंताचा।
जसा प्रकृती सांचा।
तसाच असता भूतांचा।
काय निग्रह कामाचा?।।३३।।

विषयाविषयी वर्तन।
आवड, नावड जाण।
लोभ, द्वेष हे रिपू दोन।
नकोच त्यांची आठवण।।३४।।

स्वधर्म परधर्माहुन भला।
दोषयुक्त तो जरी असला।
स्वधर्मी जरी मृत्यु जाहला।
श्रेष्ठ तरी तो, म्हणून चांगला।।३५।।

**अर्जुन म्हणाला :**

पार्थ वदला देवाला।
सांगा देवा तुम्ही मला।
इच्छेविण मनुजाला।
कोण प्रेरितो पापाला ?।।३६।।

**श्री भगवान म्हणाले :**

देव म्हणाले, हे अर्जुन !।
रजोगुणी ज्यांचे सृजन।
काम, क्रोध वैरी दोन।
महापापी ते भक्षक जाण।।३७।।

अग्नी झाकतो धुरानें।
तसा दर्पण मलानें।
गर्भ वेष्टित वारेनें।
जीव वेढतो कामानें।।३८।।

ज्ञात्याचे ज्ञान वेष्टित।
काम वैरी करी नित।
काम न होतो कधी शांत।
ज्वलंत अग्नि जसा नित।।३९।।

इंद्रिये, बुध्दि, मन।
कामाचे अधिष्ठान।
त्रिकूटयोगे मोहुन।
काम वेढीतो ज्ञान।।४०।।

इंद्रिये सर्वथा जिंकून।
नाशी जो ज्ञानविज्ञान।
तो काम, पापी म्हणून।
प्रारंभी टाक ठेचून।।४१।।

स्थूलापार इंद्रिये सरस।
इंद्रियांहुन श्रेष्ठ मानस।
मनाहुन मती असे खास।
मतीपलिकडे आत्म्याचा वास।।४२।।

मतीहून तो आत्मा थोर।
जाणून कर तू मन स्थिर।
कामरिपूचा तदनंतर।
सत्वर कर तू संहार।।४३।।

**अध्याय ३ संपन्न**

# ।। अध्याय चवथा ।।

## ज्ञानकर्मसंन्यास योग

भगवान म्हणाले :

प्रथम मी हा रवीला।
योग अव्ययी कथीला।
मग रवीनें मनूला।
व मनूनें इक्ष्वाकुला।।१।।

राजर्षि होते जाणून।
परम श्रेष्ठ हे विज्ञान।
लाभले जे परंपरेतुन।
कालांतरे गेले लोपून।।२।।

योग असा हा प्राचीन।
तुज केला मी कथन।
भक्त सखा तू म्हणून।
निजगुज वर्णिले जाण।।३।।

अर्जुन म्हणाला :

देव जन्मला आधी भास्कर।
जन्म आपला तद्नंतर।
जाणू कसे मग मी, हे ईश्वर!।
तुम्ही दिले त्या ज्ञान अगोदर?।।४।।

श्री भगवान म्हणाले :

अनेक माझे जन्म गेले होऊन।
कितीक झाले तुझेही, हे अर्जुन!।
मला होतसे सकलांचे स्मरण।
तुला न ठावे कोणताही जाण।।५।।

जन्मरहित मी अव्ययी।
ईश मी भूतांचे ठायी।
दिव्यरुप स्वगुणापायी।
जन्मतो मी अक्षयी।।६।।

जेंव्हा जेंव्हा धर्म होतसे ग्लान।
जातो आणिक अधर्म बोकाळून।
देण्यास धर्मा तेंव्हा संजीवन।
जन्मतो मी स्वये होऊन।।७।।

रक्षावया साधूजन।
दमनासाठी पापीजन।
करावया धर्मसंस्थापन।
युगायुगीं घेतो मी जनन।।८।।

मम दिव्य जन्मकर्माचे ज्ञान।
ज्यास आहे यथार्थ, हे अर्जुन!।
पुन्हा न होता देहांती जनन।
तो होतो ममठायी विलीन।।९।।

काम, क्रोध, भयातीत जन।
करिती माझे पूजन।
ज्ञानतपें शुध्द होऊन।
मत्स्वरूपी जाती मिळून।।१०।।

जे जसे मज भजती।
ते तसे फल पावती।
सकल ही जनजाती।
पथ माझा अनुसरती।।११।।

कर्मफलेच्छा जे धरती।
देवदेवता ते पूजती।
कर्मफले या जगती।
सिध्दि सत्वर पावती।।१२।।

गुणकर्म मी निरखून।
चर्तुवर्ण केले निर्माण।
पिता जरि मी त्यांचा जाण।
अकर्ता परि सनातन।।१३।।

विरक्त मी कर्मफलापासून।
म्हणून नाही कर्मफलबंधन।
उमजती जे सार यातले जन।
तेही सुटती कर्मबंधनातुन।।१४।।

मुक्त जनांनी प्राचीन।
मम दिव्य रूप जाणून।
ज्यासम केले वर्तन।
तद्वत कर तू, हे अर्जुन !।।१५।।

कर्म अकर्म कोणते।
भ्रमीत झाले जाणते।
वर्णितो मी तुज कर्म ते।
मुक्त होशील अशुभांते।।१६।।

कर्मगती गहन निश्चित।
म्हणूनी कर्माकर्म, विकर्मात।
दडले काय ते गुपीत।
जाणून घ्यावे व्यवस्थित।।१७।।

कर्मी अकर्म पाहतो।
अकर्मी कर्म जाणतो।
सर्व कर्मी रत असतो।
बुध्दिवान मनुष्य तो।।१८।।

यत्न करी जो अनासक्त।
कर्मे ज्याची ज्ञानजळीत।
त्यास म्हणावे पंडित।
साधूजनांचे असे मत।।१९।।

निज कर्मफल त्यागितो।
सदैव संतोषी असतो।
कामी आपुल्या रत असतो।
तरी न काही तो करितो।।२०।।

विरक्त मन बुध्दी ठेवितो।
ममत्व भावना जो त्यजितो।
शरीरमात्रे कर्म करितो।
दोष न त्याचा त्यास लागतो।।२१।।

मिळेल जे, ते गोड मानतो।
द्वंद्व, असूया दूर ठेवतो।
यशापयशा सम लेखतो।
सर्वपरी तो मुक्त राहतो।।२२।।

प्रकृतीगुणसंग नसे।
दिव्यरूप ज्ञान असे।
यथार्थ कर्म करितसे।
आत्मरंगी ते लीन असे।।२३।।

ब्रह्मार्पण, नवनीत।
ब्रह्मार्पित ब्रह्माग्नित।
ब्रह्मचि पाही कर्मात।
सिध्दिप्राप्त तो खचित।।२४।।

यज्ञे देवांचे पूजन।
करिती काही योगीजन।
ब्रह्माग्नित काहीजण।
यज्ञ करिती अर्पण।।२५।।

श्रवणादि इंद्रियें समस्त।
अर्पिती कोणी संयमाग्नित।
शब्दादि इंद्रियांची देतात।
आहुती कोणी इंद्रियाग्नित।।२६।।

अन्य कोणी संन्यस्त।
प्राणेंद्रियक्रिया समस्त।
अर्पिती संयमाग्नित।
ज्ञानाग्निनें प्रदिप्त।।२७।।

द्रव्ययज्ञ करिती कोणी।
तपोयोगयज्ञ कोणी।
स्वाध्यायज्ञानयज्ञ ते ज्ञानी।
कठोर व्रत राखूनी।।२८।।

अपान प्राणाचे मिलन।
अवरोधी त्यांचे वहन।
श्वसन प्रक्रिया रोखून।
प्राणायामी योगसाधन।।२९।।

मिताहार करूनी सेवन।
प्राणांत अर्पिती प्राण।
जाणती ते यज्ञ प्रयोजन।
यज्ञे करिती पापक्षालन।।३०।।

यज्ञ-शेषामृत सेवून।
पावती ब्रह्म सनातन।
यज्ञाविण नाही भूवन।
परलोक मग कोठून?।।३१।।

बहु यज्ञ असे, हे अर्जुन !।
प्रसूत वेदमुखातुन।
उत्पन्न झाले कर्मातुन।
मुक्त होशील हे जाणून।।३२।।

द्रव्ययज्ञाहुन, हे अर्जुन !।
ज्ञानयज्ञ तो महान।
यज्ञकर्मे अंति विलीन।
दिव्यज्ञानीं होती जाण।।३३।।

गुरूसेवा करून।
आणि त्यांस वंदून।
आपण करिता प्रश्न।
प्रदान करिती ज्ञान।।३४।।

हे ज्ञान होता तुज प्राप्त।
पुन्हा न होशील मोहित।
पाहशिल जेणें भूतजात।
एकरूप समस्त माझ्यांत।।३५।।

पाप्यांहुन जरि अखिल।
महापापी तू असशिल।
ज्ञाननौकी जेंव्हा बसशिल।
दुःखसागर तरशिल।।३६।।

अग्नि जसा प्रज्वलित।
काष्ठे करि भस्मसात।
ज्ञानाग्नि करि तद्वत।
पापपुण्ये भस्मीभूत।।३७।।

दिव्य ज्ञानासम या जगात।
नसे काही शुध्द, उदात्त।
निपुण असे जो योगात।
सुवेळी बिंबवी स्वतःत।।३८।।

जितेंद्रिय आणि श्रध्दावान।
पुरूषा मिळे तत्पर ज्ञान।
आत्मबोध मग विस्तारून।
शांती पावे शीघ्र, हे अर्जुन !।।३९।।

मूढ तद्वत श्रध्दाहीन।
संशयी जाता ग्रासून।
जगी या तो न सुखासिन।
परलोकी मग कोठून?।।४०।।

निज कर्मफले त्यागुन।
ज्ञाने संशय भेदून।
आत्मी ज्याचे व्यवधान।
त्यास न कर्मबंधन।।४१।।

संशय जो अज्ञानोत्पन्न।
अंतरी राहिला भरून।
ज्ञानासीनें त्यास छाटून।
ऊठ पार्था, योग साधून।।४२।।

**अध्याय ४ संपन्न**

# ।। अध्याय पाचवा ।।

## *संन्यास योग*

अर्जुन म्हणाला :

अर्जुन वदला कृष्णास।
सांगता योग, कर्मसंन्यास।
उभयांतील जे श्रेयस।
निश्चित सांगा ही माझी आस।।१।।

श्री भगवान म्हणाले :

कर्मयोग, संन्यास।
उभय युक्त मुक्तीस।
योग अधिक श्रेयस।
गौण असे तो संन्यास।।२।।

द्वेषमुक्त, वासनाहीन।
नित्य तो संन्यासी जाण।
मुक्त जो सर्व द्वंद्वातुन।
सुटे सहज बंधातुन।।३।।

सांख्य, योग दोन्ही भिन्न।
वदती मूढ न ज्ञानीजन।
एकही केवळ आचरून।
फळे लाभती दोहोंची दोन।।४।।

सांख्यांस मिळे जे स्थान।
योग्यांसही लाभे ते जाण।
सांख्य, योग पाही जो समान।
त्यास होई सत्य दर्शन।।५।।

योगावाचून, हे अर्जुन !।
संन्यास महा कठीण।
कर्मयोगी मुनीजन।
शीघ्र पावती ब्रह्मस्थान।।६।।

कर्मयोगे शुध्दचित्त।
इंद्रियें ठेवी अंकित।
स्वतःस पाही इतरांत।
कर्मयोगी तो अलिप्त।।७।।

स्पर्श, दर्शन, श्रवण, सेवन।
गंधग्रहण, गमन, शयन।
तत्सम क्रिया श्र्वसनादि करून।
मानी अकर्ता स्वतःस तत्वज्ञ।।८।।

बोलता, घेता, करिता उत्सर्जन।
तसे उघडता-मिटताही नयन।
इंद्रिय प्रकृतिचे ठेवून भान।
आपण राही अलिप्त तत्वज्ञ।।९।।

कर्मफले ईशा समर्पून।
कर्म करि जो इच्छाहीन।
जळी कोरडे जसे पद्मपान।
अलिप्त तोही तसाच पापातून।।१०।।

केवळ शरीर, बुध्दि, मन।
आणि इंद्रिय माध्यमातुन।
योगी करितसे कर्म इच्छाहीन।
आत्मशुध्दि व्हावी म्हणून।।११।।

कर्मफलें टाकून युक्त।
स्थिर शांति करि प्राप्त।
योगहीन जो फलासक्त।
बध्द होतो फलासक्तीत।।१२।।

सर्वसंग मनानें सोडून।
नवद्वारदेही सुखासिन।
आत्मरायमी वसतो जाण।
स्वये राहुनी क्रियाहीन।।१३।।

कर्तृत्व आणि कर्मही।
वा, कर्मफलभोगही।
लोकी न निर्मि प्रभु काही।
घडे स्वभावे सर्वकाही।।१४।।

पाप पुण्य नाही घेत।
कोणाचेही भगवंत।
अज्ञानें ज्ञान वेष्टित।
मोहि जे सर्व जीवजात।।१५।।

आत्मज्ञाने अज्ञान।
निःशेष होता जाण।
स्वत्व निघे उजळून।
सूर्यतेजासमान।।१६।।

सकळ बुध्दि, निष्ठा, मन।
ईश्र्वर चरणी वाहुन।
ज्ञानें दोष प्रक्षालुन।
मुक्त होई तत्परायण।।१७।।

विद्या, विनयशील ब्राह्मण।
चांडाळ, श्वान, धेनु, वारण।
एक महान दुसरा सान।
कधी न लेखती ज्ञानीजन।।१८।।

समत्वी मन स्थिरावून।
इथे जिंकिले जन्ममरण।
निर्दोष ते ब्रह्मासमान।
म्हणून झाले ब्रह्मी स्थापन।।१९।।

आनंद नाही प्रियात।
दुःख नाही अप्रियांत।
स्थिरबुध्दि मोहरहित।
ब्रह्मज्ञ तो ब्रह्मीस्थित।।२०।।

विषयसुखीं अनासक्त।
अंतरी राही सुखात।
ब्रह्मी होता समाधिस्त।
भोगी सुख ते सदोदित।।२१।।

स्पर्शजन्य सुखोपाय।
दुःखाचे ते गर्भाशय।
आरंभ ज्यांचा तसा लय।
सूज्ञ टाळती त्यांचा आश्रय।।२२।।

शरीरात वर्तमान।
करू शके जो सहन।
काम, क्रोधादिक ताण।
योगयुक्त तो सुखी जाण।।२३।।

अंतरात सुखी, सक्रिय।
योगी असा जो तेजोमय।
ब्रह्ममुक्तीचे पावूनी ध्येय।
अति होतसे ब्रह्ममय।।२४।।

मुक्त जे संशय, पापातून।
अंतरी रमले ज्यांचे मन।
सकळ भूतहित साधून।
पावती ते ब्रह्मनिर्वाण।।२५।।

क्रोध, वासना जिंकुन।
चित्त ठेविती स्वाधीन।
आत्मज्ञान संपादून।
पावती ते ब्रह्मनिर्वाण।।२६।।

सकळ बाह्य विषय त्यागुन।
भृकुटी संगमी दृष्टी लावून।
नाकात रोखूनी प्राण-अपान।
सम करितसे त्यांचे वहन।।२७।।

इंद्रियें-मनबुध्दि आवरून।
वासना, भय, क्रोध सोडून।
योगी जो मोक्षपरायण।
निश्चित तो मुक्त सदा जाण।।२८।।

सकळ यज्ञ, तपांचा भुक्त।
सर्व लोकींचा मी भगवंत।
पाहतो मी सर्व भूतहित।
जाणी हे तो, शांती करि प्राप्त।।२९।।

**अध्याय ५ संपन्न**

## ।।अध्याय सहावा।।

### ध्यान योग

श्री भगवान म्हणाले :

कर्मफलेच्छा ना धरितो।
कर्तव्याला नित जागतो।
संन्यासी तद्वत योगी तो।
नच जो यज्ञ-कर्म सोडितो।।१।।

म्हणती जो संन्यास म्हणून।
पांडवा, योग तोचि जाण।
वासना त्यागल्यावाचून।
योगी न होतो कधी जाण।।२।।

योगसाधका नवीन।
म्हणती कर्म साधन।
होता योग संपादन।
म्हणती शांती साधन।।३।।

कर्मी असे अनासक्त।
विषयी आणि विरक्त।
भोगसंकल्पातून मुक्त।
तोच खरा योगयुक्त।।४।।

स्वये उध्दरावे स्वचित्त।
उदात्त ठेवूनी ते नित।
निज मित्र, शत्रू निश्चित।
चित्त आपुले सदोदित।।५।।

स्वतो जिंकीता मन।
[illegible]
स्वैर परि ते सोडून।
वर्तते रिपू समान।।६।।

शांति पावता आत्मजित।
परब्रह्म करितसे प्राप्त।
सम सुखदुःख, उष्णशीत।
गानीतो मानावमान तद्वत।।७।।

ज्ञान-विज्ञाने संतोषला।
स्थिर जितेंद्रिय जाहला।
पाषाण, कांचन, मातीला।
पाही सम जो योगारूढ झाला।।८।।

सखा, रिपू, तटस्थाला।
पापी आणिक साधूला।
अवलोकी सम सकळा।
नर विशेष तो गानिला।।९।।

साधकें एकांती एकांतात।
राहूनी स्वये शांत चित्त।
आशा संचयेच्छा रहित।
करावी योगसाधना नित।।१०।।

शुध्द स्थान निरखून।
ना उच्च, वा नीचासन।
तृण, चर्म, वस्त्र घालुन।
दृढ करावे स्थापन।।११।।

चित्तेंद्रिये आवरून।
एकाग्र वरि बैसून।
आत्मशुध्दि व्हावी म्हणून।
योग तो जोडावा जाण।।१२।।

शरीर, मस्तक, मान।
अचल उभे ठेवून।
टाळून मग अवलोकन।
नाकाग्री खिळवावे नयन।।१३।।

अविचल, अति शांत।
मनी होऊनी भयमुक्त।
ब्रह्मचर्य व्रत आचरित।
बसावे मद्रुपी ध्यानस्त।।१४।।

अभ्यास करूनी नित उक्त।
मनास ठेवूनी संयमित।
मजठायी ठेविता चित्त।
मोक्षधाम तो करि प्राप्त।।१५।।

सेवन वा लंघन।
जागृती वा शयन।
होता बहु, हे अर्जुन!।
योग न साधे कधी जाण।।१६।।

कर्म, विहार, भोजन।
जागृती आणि शयन।
सुयोग्य यांचे संयोजन।
दुःखहारी योग साधन।।१७।।

निज मानस आवरून।
अंतरी जाई रंगून।
उरता मग इच्छाहीन।
त्यास "योगी" युक्त अभिधान।।१८।।

निर्वात स्थळी दिपज्योत।
जशी तेवते अव्याहत।
अत्मयोगीही स्थितचित्त।
वर्णिती असतो तद्वत।।१९।।

रोखूनी निज चित्ताला।
संचार मनीचा संपला।
स्वये अंतरी देखिला।
आत्मानंदी रंगला।।२०।।

बुध्दिनें इंद्रियातीत।
सुख भोगूनी अत्यंत।
ढळे न होता स्थित।
तत्वापासूनी किंचित।।२१।।

सुखाहुन त्या अद्‌भूत।
तुच्छ मानी लाभ उर्वरित।
अशा अवस्थि होता स्थित।
महासंकटी चळे न यत्कींचित।।२२।।

नुरली जेथे दुःख भावना।
म्हणती तेथे योगसाधना।
निश्र्चये दृढ योग धारणा।
करावी ती चित्तभ्रमाविना।।२३।।

संकल्पातून उत्पन्न।
कामादिक सर्व सोडून।
मने सर्वेंद्रियगण।
सर्वत्र करावा दमन।।२४।।

धीराधीरानें आवरावे मन।
क्रमशः दृढमती योजून।
आत्मस्वरूपी मग रोखून।
करू नये अन्यकाही चिंतन।।२५।।

अधीर मन सुसाट धावे।
फुटता वाट त्या उडणे ठावे।
त्यास तेथूनी वळवावे।
आत्ममंदीरी बसवावे।।२६।।

रजोगुण झाले शांत।
झाले मनही प्रशांत।
ब्रह्मी होऊनी अद्वैत।
योगी राही सुखात अत्यंत।।२७।।

करूनी सदा योगाभ्यास।
कर्मे जाती लयास।
ब्रह्मानंद अनायास।
लाभे अपार योग्यास।।२८।।

वसतो मी सर्वां देही।
भूतें सर्व माझ्यातही।
योगयुक्त जगी पाही।
समान ते सर्वकाही।।२९।।

सर्वत्र त्यास मी दिसतो।
मदंतरी जो सर्व पाहतो।
त्यास कधी न मी अंतरतो।
कधी नच तो मज मुकतो।।३०।।

सर्व-भूतीं मज़ पाहतो।
अन् अद्वैती मज़ भजतो।
प्रपंची जरि तो वर्ततो।
तो मजठायी तरी राहतो।।३१।।

सकळ भूतमात्रांत।
सुखदुःखीही अद्वैत।
मानीतो जो अखंडित।
परम योगी तो संमत।।३२।।

अर्जुन म्हणाला :

कृष्णा तुम्ही जो मजला।
सांख्ययोग वर्णिला।
तो न मनी मम ठसला।
स्वैर चित्त कारण त्याला।।३३।।

मन चंचल, हट्टी भारी।
वायुसंगे घेई भरारी।
कठीण आणणे त्या माघारी।
बांधावे मग ते कसे तरी?।।३४।।

श्री भगवान म्हणाले :

चित्त चंचल नावरे।
तू वदलासी ते खरे।
सराव-वैराग्याद्वारे।
निश्चित परि आवरे।।३५।।

मन असता अनावर।
योगसिध्दि दुष्कर।
योग्य उपाये करिता स्थिर।
होई साध्य, हे धनुर्धर।।।३६।।

अर्जुन म्हणाला :

श्रध्दा असूनी यत्नहीन।
म्हणून ढळे तो योगापासून।
मुकून मग ते सिध्दिस्थान।
कळे न जातो कोठे वाहुन।।३७।।

उभय पथी भ्रष्ट होऊन।
ब्रह्ममार्ग जाई विसरून।
'त्रिशंकू' अवस्थि मग जाऊन।
नष्ट न होई का मेघासम छिन्न?।।३८।।

संशय माझा तुम्हीच मधुसुदना।
समूळ फेडा ही माझी याचना।
निरसन त्याचे तुम्हाविना।
अशक्य दिसते अन्यजना।।३९।।

श्री भगवान म्हणाले :

या जगती ना त्या जगती।
नाश पावतो कधी यति।
सत्कर्म ज्याचा सदा सोबती।
त्यास न स्पर्शी अधोगती।।४०।।

चिरकाळ पुण्य लोकांत।
वास करूनी योगच्युत।
धर्मपरायण कुलात।
जन्म करितसे प्राप्त।।४१।।

अथवा कुळीं ज्ञानवंत।
जन्म घेतसे क्वचित।
असा जन्म या जगांत।
खरेचि दुर्लभ अत्यंत।।४२।।

पूर्वजन्मीची दिव्य चेतना।
तिथे आणितो पुनरूज्जीवना।
सिध्दीस्तव तो मग अर्जुना।
प्रयत्न करितो पुनः पुनः।।४३।।

पूर्वजन्मीचे संचित।
ओढ लावी योगाप्रत।
जिज्ञासू योगपंथात।
होतसे शब्दब्रह्मातीत।।४४।।

कठोर यत्नें योग साधुन।
योगी होतसे किल्मिषहीन।
अनेक जन्मी सिध्दी पावून।
त्यास लाभते मोक्षस्थान।।४५।।

तापस, ज्ञानी, कर्मिष्ठ।
सर्वाहुनी या जो श्रेष्ठ।
योगी मानिला तो इष्ट।
यास्तव हो तू योगनिष्ठ।।४६।।

योग्यांमाजी समस्त।
श्रध्दावंत मद्‌गत।
भजतो मज हृदयात।
थोर योगी तो माझे मत।।४७।।

**अध्याय ६ संपन्न**

# ।।अध्याय सातवा।।

## ज्ञानविज्ञान योग

श्री भगवान म्हणाले :

प्रेमभरे ममासक्त।
योग असता साधित।
होईन कसा तुज ज्ञात।
ऐक पार्था इत्थंभूत।।१।।

ज्ञानासह ते विज्ञान।
सांगतो तुज, हे अर्जुन !।
समग्र इथे ते जाणून।
जाई जाणणे संपून।।२।।

सहस्त्रावधी मनुष्यांत।
विरळाच झटे सिध्दिप्रत।
त्यांतील सिध्दही क्वचित।
जाणतो मम इंगित।।३।।

धरणी, अग्नि, जीवन।
समीर आणि गगन।
अहं, बुध्दी तसे मन।
अष्टांगे ही मम भिन्न।।४।।

स्थूल प्रकृती व्यतिरिक्त।
सूक्ष्म प्रकृती अतिरिक्त।
जीव स्वरूपी जी व्यक्त।
होऊन राही जगव्याप्त।।५।।

अपरा, परा अधिष्ठानी।
सकळ भूतांची जननी।
उत्पत्ति, स्थिती लय स्थानी।
मीच असे हे घे ध्यानी।।६।।

मजपरि अन्य या जगात।
श्रेष्ठ न काही यत्किंचित।
मणी ओविले धाग्यात।
तसे विश्र्व हे माझ्यात।।७।।

उदकातिल रस मी।
रविचंद्राचे तेज मी।
वेदी ॐ, नभीं शब्द मी।
पुरूषीं पौरूष जाण मी।।८।।

वसुधेचा गंध मी।
अग्नितिल तेज मी।
जीवांचाही जीव मी।
तापसांचे तप मी।।९।।

बीज मी सर्वभूतांत।
जाण अर्जुना शाश्र्वत।
बुध्दी मी बुध्दिमानांत।
बलहि मी बलवानांत।।१०।।

कामराग विवर्जित।
बल मी बलवंतांत।
सद्धर्म चौकटीत।
काम मी सर्व-भूतांत।।११।।

सत्व, रज तमोगुण।
तिनही माझे सृजन।
जरी ते माझे आधीन।
तरी मी राही स्वाधीन।।१२।।

त्रिगुणभावे मोहित।
सकल ही जीवजात।
त्रिगुणातीत, शाश्वत।
मजला नाही जाणित।।१३।।

त्रिविधगुणी ही दैवी माया।
कठीण अति तरून जावया।
येती परी जे ममाश्रया।
तेच तरती मम माया।।१४।।

मूढ, नराधम, हीन जन।
मायाभ्रांत होऊनी ज्ञान।
असुरी भाव अन् जोडून।
कधी न येती मज शरण।।१५।।

सुकृत, चतुर्विध लोक।
असती माझे उपासक।
विठ्ठल तद्वत हितेच्छुक।
जिज्ञासु, ज्ञानी आणिक।।१६।।

ज्ञानी थोर तो सर्वांत।
भक्ती करी जो नितांत।
प्रिय त्यास मी अत्यंत।
तसाच मज तो निश्चित।।१७।।

ज्ञानी सारे उदार असती।
मज जणू ते मज वाटती।
नित्य ठेवूनि मज चित्ती।
मानिती मज ते उच्च गति।।१८।।

अनेक जन्मांचे अंती।
ज्ञानी पावतो शरणागती।
वासुदेव पाहे सभोवती।
दुर्लभ असा तो थोर अति।।१९।।

कामनांनी वेडावून।
ज्ञानदीप गेला विझून।
अन्य देवतांचे भजन।
करि स्व-भावे नेम पाळून।।२०।।

भक्तास देव जो आवडतो।
श्रध्देनें तो भजू इच्छितो।
प्रिय त्यास असा जो देव तो।
दृढ श्रध्दा त्यावर मी ठेवितो।।२१।।

श्रध्देनें ते इष्ट दैवत।
भजता मग त्या स्वरूपात।
पावतो फल वांछित।
मीच निर्मिले जे खचित।।२२।।

अल्पज्ञांचे भक्तीफळ।
टिकून राही अल्पकाळ।
देवभक्त पावती देवस्थळ।
परि माझे मज अढळ।।२३।।

स्वरूप माझे जरी निर्गुण।
अल्पज्ञ मानिती ते सगुण।
अव्यक्त रूप जो चिरंतन।
घेऊ न शकती ते जाणून।।२४।।

योगशक्तीनें मी वेष्टीत।
सर्वांस न होतो मी व्यक्त।
मी अजन्मा अन् शाश्वत।
मूढ नाही हे जाणित।।२५।।

भूत, सांप्रत, भविष्यातिल।
झाली, होतीही जी होतील।
जाणतो मी भूते ती यांतील।
कोणी न परी जे मज जाणिल।।२६।।

इच्छा-दोषातून चित्त।
अडकले द्वंद्व-मोहात।
जगी सर्व भूत-जात।
घेई जन्म या मोहात।।२७।।

कर्मे करूनी पुण्यरूप।
पातके पावली लोप।
मोह तोडूनी द्वंद्वरूप।
व्रती येती मजसमीप।।२८।।

जरामरणातुन सूटू पाहती।
ममाश्रय घेऊन ते झटती।
पूर्णब्रह्म जाणून ते असती।
अध्यात्म, कर्मही तसे जाणती।।२९।।

अधिभूतीं, अधिदैवात।
अधियज्ञी मी भगवंत।
पाहती इति जे दृढचित्त।
मृत्युपंथीही मज ते स्मरतात।।३०।।

**अध्याय ७ संपन्न**

# ।।अध्याय आठवा।।

## अक्षरब्रह्म योग

आर्जुन म्हणाला :

ब्रह्म, आध्यात्म ते काय।
सकाम कर्मही जे होय।
अधि-भूत-दैव कसे काय।
सांगा मज हे वार्ष्णेय।।१।।

कोण, कसा तो अधियज्ञही।
कसा राही तो या देही?।
तुम्हा जाणती प्रयाणीही।
कसे योगी जे निग्रही?।।२।।

श्री भगवान म्हणाले :

परब्रह्म आहे थोर शाश्र्वत।
आध्यात्म तें आत्मभाव जो नित।
भूतोत्पत्तीरा कारणीभूत।
सकाम कर्म ते ज्ञात।।३।।

नित नाशवंत प्रकृती, अधिभूत।
ईशरूप दिव्य ते अधि-दैवत।
निजरूपे मी वसतो सर्व भूतांत।
अधियज्ञ मजसी त्या म्हणतात।।४।।

अंतकाळीही जे जन।
करूनी माझे स्मरण।
शरीर देती सोडून।
मलाच जाती ते मिळून।।५।।

अंतकाळ येता जवळी।
भाव स्मरे जे त्या वेळी।
भावस्वरूप ते कवटाळी।
सांगतो तुज मी वनमाळी।।६।।

नित्य यास्तव स्मरून मला।
युध्दधर्म तू पाळ आपुला।
मनःबुध्दी अर्पिता तू मजला।
प्राप्त होईन मी तुजला।।७।।

अभ्यासीं दंग होऊन।
निश्चल ठेवूनी मन।
नित्य करीता मम ध्यान।
मलाच जाई तो मिळून।।८।।

सर्वज्ञ, शासक, पुरातन।
सर्वाधार, सूक्ष्म तो अणूहुन।
असे पलिकडे तमाहुन।
अतर्क्य, तेजस्वी सूर्यासमान।।९।।

प्रयाणकाळी एकाग्र चित्त।
योगबळानें आणि भक्तीयुक्त।
भूवयांत ठेवितो प्राणस्थित।
त्यास लाभतो दिव्य पुरूष निश्चित।।१०।।

वेदज्ञ जे अक्षर उच्चारती।
संन्यस्त, महर्षि जयास मिळती।
ब्रह्मचर्यव्रती जी स्थिती इच्छिती।
संक्षेपरूपी तुज सांगतो ती।।११।।

सर्वेंद्रियद्वारे ठेवुनि बंदिस्त।
कोंडून आणि मनास हृदयात।
प्राणास मस्तकी करुनी स्थित।
होतसे मनुज तो योगस्थित।।१२।।

मुखें उच्चारून ब्रह्माक्षर।
स्मरण करी जो माझे नर।
सोडूनि जाता कलेवर।
गतीस पावतो तो थोर।।१३।।

निश्चल ठेवून आपुले मन।
नित्य करी जो मम स्मरण।
भक्तीयोगी नित्य रममाण।
त्यासी सहज मिळे मी, म्हणून।।१४।।

मजपाशी संत जे येती।
मोक्षसिध्दीस ते पावती।
कधी न ते परतुन येती।
दुःखद, नश्वर या जगती।।१५।।

ब्रह्मादि लोकीं जे जाती।
पुनर्जन्मास ते येती।
मलाच परि जे भेटती।
जन्मचक्रातुन सुटती।।१६।।

दिवसास ब्रह्माच्या सहस्त्र युगें लागती।
रात्रिसही त्याच्या तेवढीच ती लोटती।
ब्रह्मज्ञ सर्वही ते असे समजती।
कालोपासकही तसाच तो गणती।।१७।।

आरंभ होता ब्रह्माचा दिन।
भूतें जन्मती अव्यक्तातून।
तद्वत होता निशा आगमन।
त्या अव्यक्तीं होती ती लीन।।१८।।

पुन्हा जेंव्हा दिनारंभ होतो।
परवशतेनें पुन्हा तोच तो।
भूतसंघ तेंव्हा जन्मा येतो।
रात्र होता अन् पुन्हा नासतो।।१९।।

अव्यक्ताहून थोर अति।
अक्षय स्थूलातीत प्रकृती।
भूतें सगळी नाश पावती।
कदापि न होई नष्ट ती।।२०।।

अव्यक्त, अक्षर जे म्हणती।
त्यास जाणती परम गति।
धाम ते मम जे पांवती।
कधी न तेथून माघारी येती।।२१।।

पुरूष असा तो थोर अति।
अनन्य भक्तीनें त्याची प्राप्ती।
सकळ भूतें ज्यात राहती।
भरून राहिला तो जगती।।२२।।

कोण्याकाळी देह करिता विसर्जन।
केव्हां येती परतुन योगीजन।
कधीच अथवा येती न ते परतुन।
ऐक आता, तुज करितो कथन।।२३।।

ज्वाळी प्रकाशी, दिनी, उत्तरायणी।
शुक्लपक्षी, षण्मासातील क्षणी।
भौतिक जगती मरण पावूनी।
ब्रह्मास मिळती ब्रह्मज्ञानी।।२४।।

धुम्र, यागिनी, दक्षिणायनी।
कृष्णपक्षी, षण्मासातील क्षणी।
भौतिक जगती निवर्तुनी।
मागे फिरती चंद्रलोक पावूनी।।२५।।

प्रकाश, तम या जगात।
पथ हे दोन्ही शाश्र्वत।
एक मनुजा करी मुक्त।
दुजा पाठवी परत।।२६।।

जाणून भिन्न हे पथ दोन।
कधी न मोहती योगीजन।
सदासर्वदा तू म्हणून।
अर्जुना हो योगमग्न।।२७।।

जसे यज्ञी, तपी, दानी।
लाभे पुण्य तसे पठणी।
लंघूनी हे सर्व जाणूनी।
योगी विराजे परमाद्य स्थानी।।२८।।

**अध्याय ८ संपन्न**

## ।।अध्याय नववा।।

### *राजविद्या राजगुह्य योग*

श्री भगवान म्हणाले :

महागुपीत हे करितो मी कथन।
तुला सज्जना, विज्ञानासह ज्ञान।
होशील मग तू ते जाणून।
मूक्त भौतिक अशुभातून।।१।।

राजविद्या गुह्योत्तम ज्ञान।
दिव्य आणिक अति पावन।
सहज साधे अनुभवातून।
धर्म-सार ते चिरंतन।।२।।

अश्रध्द जे या धर्मावर।
ते न पावता मला नर।
जन्म-मृत्युच्या नश्र्वर।
परतुन येती पथावर।।३।।

व्यापिले सर्व मी जगत।
माझिया रूपे अव्यक्त।
भूतें अवघी माझ्यांत।
मी न परि त्या भूतांत।।४।।

भूतें नसती तरिही माझ्यांत।
दिव्य शक्ती ही मम अद्‌भूत।
धारितो, पोसतो प्राणीजात।
नाही परि मी त्या भूतांत।।५।।

सर्व संचारी महामारूत।
जसा राहतो गगनात।
तशीच सर्व प्राणीजात।
ममठायी असते स्थित।।६।।

सर्व भूतें कल्पांती।
माझ्यात सामावती।
पुन्हा कल्पारंभी ती।
मम कारणे सृजती।।७।।

प्रकृती घेऊनी हाती।
पुन्हा करितो निर्मिती।
सर्व भूतांची या जगती।
प्रकृतीवश जी असती।।८।।

कर्मी असतो इच्छाहीन।
जसा अर्जुना उदासीन।
मुक्त राहतो मी म्हणून।
सदैव कर्मबंधनातुन।।९।।

मम अधिष्ठानें प्रकृती।
प्रसवे चराचर जगती।
म्हणून जगी या संभवती।
पुन्हा नाश न निर्मिती।।१०।।

मी धारितो नरदेह यदा।
मूढ लेखती हीन तदा।
जाणताच न मला कदा।
सत्यस्वरूपी परमानंदा।।११।।

आसुरी, नास्तिक वृत्तीत।
रमले ज्यांचे नित चित्त।
अवस्थि अशा ते होता स्थित।
ज्ञानकर्मे त्यांची विफलीत।।१२।।

दैवी प्रकृती अधिष्ठून।
अनन्य-भावे योगीजन।
करिती माझे भजन।
आदि, अक्षय मज जाणून।।१३।।

मम किर्तनी जे रंगती।
भक्ती-भावे मज वंदिती।
यत्नशील जे दृढव्रती।
नित्य मज ते उपासती।।१४।।

अन्य ते उपासून ज्ञान।
एकत्वी द्वैत-भावे पाहुन।
नानारूपीं करिती मम पूजन।
सकल व्यापका मज जाणून।।१५।।

संकल्प आणिक यज्ञ मी।
तर्पण तसेच औषध मी।
दिव्यमंत्र मी, तूपही मी।
अग्निस अर्पित आहुती मी।।१६।।

जनक, जननी, धारक मी।
पितामह, ज्ञेय, पावन मी।
ॐकार तसाच केवळ मी।
तिन्ही वेदही आणिक मी।।१७।।

गति, पालक, साक्षी, स्वामी।
सखा, आश्रय, निवास मी।
आधार, आदि-अंतही मी।
निधान, बीज, अक्षय मी।।१८।।

तापतो मी, वर्षतो मी।
खेचितो जल तद्वत मी।
मृत्यू, मोक्ष धामही मी।
सत्-असत्ही मीच मी।।१९।।

त्रिवेदज्ञ सोम-प्राशनें पुनीत।
यज्ञ-पूजने स्वर्गेच्छा ते धरतात।
इंद्रलोकी पुण्य-कर्मी ते जातात।
दिव्यानुभव अन् ते घेतात।।२०।।

असे भोगुनी स्वर्ग-सुख ते महान।
भू-लोकी परतती पुण्य होता क्षीण।
वेद-धर्म तो करूनी असा पालन।
पुन्हा पडती ते जन्म-मृत्यी अडकून।।२१।।

सकल मनो-भावे चिंतुन।
मलाच भजती जे जन।
योग त्यांचा मी वाही जाण।
करितो त्यांचे अन् रक्षण।।२२।।

अन्य देवता उपासती।
ठेवून श्रध्दा निजचित्ती।
तरिही ते मज पूजती।
विपरित मार्गी जरी जाती।।२३।।

सकल यज्ञांचा मी भोक्ता।
मीच स्वामी, फलदाता।
तत्व न माझे जाणता।
पतन होईल सर्वथा।।२४।।

देवव्रती पावती देवांसी।
पितृपूजक ते पितरांसी।
भूतोपासक भूतांसी।
मद्‌भक्त पावती मजसी।।२५।।

पान, पुष्प, फल, पाणी।
प्रेमभरे जो मज कोणी।
अर्पितो, ते शुध्द मानुनी।
सेवितो मी चक्रपाणी।।२६।।

करिसी तू जे वर्तन।
हवन आणिक दान।
तपाचरण वा सेवन।
सर्व मला ते कर अर्पण।।२७।।

संन्यास-योग तू जोडून।
कर्मफलाच्या शुभाशुभातून।
विमुक्त होऊन, हे अर्जुन!।
मलाच जाशील तू मिळून।।२८।।

सम मजसी सर्व भूतजात।
मज जवळी नसे पक्षपात।
भक्तीनें परि जे भजतात।
मद्रुपी ते, अन् मी त्यांच्यात।।२९।।

महा दुराचरण जो करतो।
अनन्य-भावे परि मज भजतो।
समजावा निश्चित साधू तो।
सुनिश्चयी कारण तो असतो।।३०।।

धर्मात्मा तो होऊन सत्वर।
शांती पावतो निरंतन।
भक्त न माझा नश्वर।
जाण खचित, हे धनुर्धर!।।३१।।

आश्रय माझा घेऊन।
नारी, वैश्य, शूद्रजन।
वा जन्मले जे कुळी हीन।
ते हि पावती मोक्षस्थान।।३२।।

ब्रह्मर्षि वा द्विज पुण्यवंत।
कशास त्यांची वर्णावी बात।
आलारा नश्वर, दुःखी लोकांत।
भज तू यास्तव मज निश्चित।।३३।।

नित्य भक्तीनें मज चिंतुन।
वंदून मला करि पूजन।
मला असे ते समर्पून।
मद्रुपी होशील तू विलीन।।३४।।

**अध्याय ९ समाप्त**

## ।।अध्याय दहावा।।

*विभूती योग*

श्री भगवान म्हणाले :

पुन्हा एकदा ऐक, हे अर्जुन।।
थोर, हितकर, मम वचन।
परमप्रिय सखा तू म्हणून।
तव हितार्थ करितो कथन।।१।।

महर्षि आणिक देवादिक।
त्यांस न माझा जन्म ठाऊक।
त्या सकळांचे मी एक।
आदिकारण निःशंक।।२।।

अनादि, अजन्मा, सर्वेश्र्वर।
असे जाणतो मज जो नर।
निर्मोह, सूज्ञ तो धरेवर।
पापमुक्त तो खरोखर।।३।।

बुध्दी, ज्ञान ते निःसंशय।
निर्मोह, निग्रह, क्षमा, सत्य।
सुख-दुःख, जन्म-मृत्यु, भय।
मीच निर्मितो अन् अभय।।४।।

अहिंसा, साम्य, तप, तृप्ती।
दान, यशापशय वृत्ती।
बहुविध अवघ्या भूतीं।
मजपासून संभवती।।५।।

सप्तर्षि, मनू चार जे झाले।
मम मन भावे ते निर्मिले।
जीव सर्व बहु लोकांतले।
त्यांचेपासून ते जन्मले।।६।।

नीट ज्यास उलगडे।
योग-विभूतिचे कोडे।
योग त्यास मम घडे।
सत्य असे हे उघडे।।७।।

मी सकळांचे उगमस्थान।
मिळे प्रेरणा मजपासून।
ओळखूनी हे विद्वज्जन।
भजनी माझ्या होती तल्लीन।।८।।

मम भक्त आपुले मन, जीवन।
मजठायी करिती समर्पण।
परस्परांकरूनी प्रबोधन।
गाती आनंदे ममगान।।९।।

प्रितीपूर्वक होऊनी तल्लीन।
भजनी माझ्या गेले रंगून।
त्यांस देई मी बुध्दीयोग ज्ञान।
होतील जेणे ममठायी विलीन।।१०।।

स्वये राहुनी त्यांचे ह्रदयात।
होऊन आणिक अनुकंपीत।
ज्ञान-दीपानें प्रज्वलीत।
अज्ञान-तमाचा करितो मी अंत।।११।।

अर्जुन म्हणाला :

आहात तुम्ही परमधाम, पावन।
परब्रह्म, पुरूषोत्तम, भगवान।
दिव्यादि देव, अजन्मा सनातन।
श्रेष्ठ तुम्हाहुनी नसे अन्य कोण।।१२।।

एकमुखे वदती ऋषी जसे।
देवर्षि, नारद असित तसे।
तसेही कथिले देवल, व्यासे।
तुम्हीही सांगता तेच असे।।१३।।

तुम्ही मला जे सांगितले।
पूर्णसत्य ते मी मानिले।
देवदानवा ना कळले।
रूपचं तुमचे आगळे।।१४।।

भूतभावना, भूतेशा।
पुरूषोत्तमा, जगदिशा।
देवाधिदेवा, सर्वेशा।
स्व-रूप जाणता स्वये परेशा।।१५।।

सांगा आपण मजप्रति।
सर्व दिव्य निज विभूति।
ज्यांचेद्वारे तुम्ही श्रीपती।
भरून राहिला या जगती।।१६।।

तुम्हास कसे ते मी जाणावे?।
चिंतन तुमचे कसे करावे?।
कोण्या स्वरूपी तुम्हा स्मरावे?।
मज आपण ते सांगावे?।।१७।।

सविस्तर सांगा पुन्हा मला।
विभूति आणि योग आपुला।
सेवून तुमच्या वचनसुधेला।
अजून ममात्मा तृप्त न झाला।।१८।।

श्रीभगवान म्हणाले :

अपार माझ्या विभूति असती।
अशक्य करणे त्यांची गणती।
सांगेन पार्था परि तुजप्रति।
केवळ दिव्य प्रधान विभूति ।।१९।।

सकल जीवांच्या अंतर्यामी।
स्थित असतो परमात्मा मी।
भूतांस अवघ्या आरंभ मी।
मध्य तद्वत जाण अंत मी।।२०।।

आदितिसुतांत विष्णु मी।
ज्योर्तिगणात सूर्य मी।
वायुगणांत मरीचि मी।
तारागणांत चंद्र मी।।२१।।

सामवेद मी वेदांत।
इंद्र असे मी देवांत।
चैतन्य मीच भूतांत।
चित्तहि मी इंद्रियांत।।२२।।

रूद्रांमधील शंकर मी।
यक्ष-राक्षसीं कुबेर मी।
वसूंमधील अग्निही मी।
सकल नगांत मेरू मी।।२३।।

बृहस्पती पुरोहितांत मी।
सेनापतींत कार्तिक मी।
जलाशयांत जलधी मी।
जाण अर्जुना असतो मी।।२४।।

महर्षींत असे भृगु मी।
वाणींत तो ॐकार मी।
जप सर्व यज्ञांत मी।
हिमालय अचलांत मी।।२५।।

अश्वत्थ सर्व वृक्षांत।
नारद मी देवर्षींत।
चित्ररथ गंधर्वांत।
कपिलमुनी मी सिध्दांत।।२६।।

उच्चैश्रवा मी अश्वांत।
गजेंद्रांत मी ऐरावत।
मीच नृपती नरांत।
जाण अर्जुना निश्चित।।२७।।

वज्र आयुधांत मी।
सुरभी गायींत मी।
प्रजोत्पादक काम मी।
वासुकी सर्पराज मी।।२८।।

अनंतनाग नागांत मी।
वरूण जलदेवतांत मी।
अर्यमा पितरांत मी।
नियंत्रकीं यमदेव मी।।२९।।

दैत्यांत प्रल्हाद मी।
काळ, गणकांत मी।
सिंह, श्वापदांत मी।
गरूड खगराज मी।।३०।।

वायु मी वेगवानांत।
मी राम शस्त्र-शूरांत।
मगर सर्व मत्स्यांत।
मीच गंगा सरितांत।।३१।।

सकल सृष्टीचा आदि-अंत मी।
अर्जुना तसाच मध्यहि मी।
अध्यात्म-विद्या विद्यांत मी।
तर्कशास्त्रींत तत्व-बोध मी।।३२।।

अद्याक्षर अक्षरांत मी।
समासांतील द्वंद्वहि मी।
असे सनातन काळ मी।
चतुर्मुखी धाता ब्रह्मा मी।।३३।।

सकल विनाशक मृत्यु मी।
भविष्यकालीन उद्‌भव मी।
किर्ती, वाणी, श्री, ललनांत मी।
बुध्दी, स्मृती, दृढता, क्षमाहि मी।।३४।।

बृहत्साम स्तोत्रांतील मी।
छंदांत मंत्र गायत्री मी।
मार्गशीर्ष तो मासांत मी।
ऋतुंत सर्व वसंत मी।।३५।।

लबाडांत जुगार मी।
तेजस्व्यांत तेजहि मी।
जय आणि निश्चय मी।
सात्विकांतील सत्व मी।।३६।।

यादवांत वासुदेव मी।
पांडवांत धनंजय मी।
मुनींत महर्षी व्यास मी।
तत्वज्ञांत कवि उशनी मी।।३७।।

शासकांचे दंड साधन।
विजिगीषुंचे नितिमान।
गुपीतांतील मी मौन।
ज्ञानीजनांतील मी ज्ञान।।३८।।

तसेच, हे धनुर्धर !!
सृष्टीचा मी बीजांकूर।
व्यापिले मी चराचर।
अशक्य मजविण संसार ।।३९।।

मम दिव्य विभूति अनंत।
परि द्यावा केवळ दृष्टांत।
म्हणून वर्णिला संक्षिप्त।
मम विभूति वृत्तांत।।४०।।

जे जे विभूति-प्रभावित।
वैभव, लक्ष्मी, बलवंत।
मम तेजांशे ते निर्मित।
जाण अर्जुना हे निश्चित।।४१।।

फार अथवा हे ज्ञान।
कशास घ्यावे तू जाणून।
एकांशाने विश्र्व व्यापून।
मीच धारिले ते जाण।।४२।।

**अध्याय १० संपन्न**

## ।।अध्याय अकरावा।।

*विश्वरूपदर्शन योग*

अर्जुन म्हणाला :

कृपावंत मजवरी होऊन।
परम गुह्य आध्यात्म ज्ञान।
आपण करिता मज कथन।
मुक्ती पावलो मोहातुन।।१।।

ऐकला मी सविस्तर।
भूतोद्‌भव संहार।
महिमा तुमचा तो थोर।
अगाध, अव्ययी, अपार।।२।।

जसे आपण सांगितले।
दैवी रूप ते मी मानिले।
जग हे तुम्ही कसे व्यापिले।
प्रत्यक्ष पहावे मनी आले।।३।।

असाल मानित जर आपण।
समर्थ घेण्यास मी दर्शन।
तर पण मज, हे नारायण!।
निजरूप दाखवा सनातन।।४।।

श्री भगवान म्हणाले :

देव म्हणाले ऐकून या वचना।
करितो पूर्ण मी तव कामना।
शत-सहस्त्र, वर्ण, आकारी नाना।
दिव्य रूपे मम पहा आता अर्जुना।।५।।

आदित्य, वसु, रूद्र महा।
हे अश्विनी, वायुगण हा।
कुणी न पाहिला कदापि हा।
दिव्य पट तू नीट पहा ।।६।।

आज इथे मम देहांत।
विश्र्व चराचरासहित।
आणिक जे तव इप्सित।
पहा अवघे एकत्रित।।७।।

तव नयनांनी सांप्रत।
पाहू न शकसी मज खचित।
देतो नेत्र मी तुज अद्‌भूत।
मम रूप दर्शना साक्षात।।८।।

संजय म्हणाला :

असे बोलून, हे राजन !।
योगेश्र्वर श्रीभगवान।
देते झाले पार्था आपण।
निज विश्र्वरूप दर्शन।।९।।

बहु मुखे, नेत्र, दर्शनें अद्‌भूत।
बहु दिव्य अलंकारे विभूषित।
असंख्य दिव्य आयुधांसहित।
पार्था रूपे दिसली विश्र्वमूर्तीत।।१०।।

दिव्य फुले वस्त्रांकित।
दिव्य परिमले लिप्त।
विश्र्वव्यापी अद्‌भूत।
देव पाहिला अनंत।।११।।

एकत्र प्रकटले जरी।
सहस्त्र सूर्य अंबरी।
देवांग प्रभेशी तरी।
होई न त्यांची बरोबरी।।१२।।

समयी त्या विश्र्वमूर्तीत।
अवघे जग एकत्रित।
तसेच आणि विभाजित।
अर्जुना दिसले विस्तृत।।१३।।

विस्मयचकीत अर्जुन।
रोमांच अंगी दाटून।
देवा नतमस्तक वंदून।
वदला त्यांसी हे वचन।।१४।।

अर्जुन म्हणाला :

देव-देवता, सकळ भूतजात।
कमलासनी ब्रह्मा, शिव तद्वत।
महाऋषींसह सर्व सर्पजात।
देही पाहिले तुमच्या एकत्रित।।१५।।

सर्वांगी अक्षय अनंतरूपात।
अनेक उदरे, मुखे, चक्षु, हात।
विश्र्वेश्र्वरा मज नेत्री दिसतात।
परि न दिसतो आदि, मध्य, अंत।।१६।।

हे मुकुट, गदा, चक्रधारी !।
सूर्य तळपे जसा अंबरी।
तेज तुमचे त्यासम भारी।
पाहणे दुष्कर जे मुरारी।।१७।।

अक्षर तुम्ही परम, पावन।
जगास अंति तुमचे निधान।
तुम्हीच रक्षिता धर्म सनातन।
देवा तुम्ही पुरूष पुरातन।।१८।।

अगाध तुमचे बल, हात।
नेत्र तुमचे चंद्र-सूर्यावत।
प्रदिप्त अग्नि तुमचे मुखांत।
त्या तेजानें विश्र्व होई तप्त।।१९।।

दशदिशा, अंतराळ।
तुम्ही व्यापिले सकळ।
रूप पाहुनी विक्राळ।
त्रैलोक्य झाले व्याकुळ।।२०।।

सर्व देवता होऊन आश्रित।
भये प्रार्थिती जोडुन हात।
गाऊनी स्तोत्रें सिध्दगण, संत।
तुम्हास अवघे भजतात।।२१।।

गण आदित्य, वसु, साध्य, समीर।
विश्र्वेदेव, रूद्र, अश्र्विनीकुमार।
गंधर्व, पितृसंघ, यक्षासुर।
स्तिमित झाले तुमचे समोर।।२२।।

अनेक तोंडे, बाहु, नयन।
उदंड पाय, उदरे, रदन।
विराट असे हे रूप पाहून।
व्यथित झाले समग्र त्रिभूवन।।२३।।

नभस्पर्शी वासले वदन।
तेजवर्णी विशाल नयन।
प्रचंड असे हे रूप पाहून।
भये राहिले धैर्य, न, भान।।२४।।

कराल दाढा, विक्राळ वदन।
प्रलयाग्निसम रूप पाहून।
दिङमूढ होऊन गेले मन।
म्हणूनी आता तुम्ही व्हा प्रसन्न।।२५।।

धृतराष्ट्र पुत्रांसहित।
भूप-संघ सर्व खचित।
भीष्म, द्रोण, कर्ण तद्वत।
मुख्य वीर आमुचे रागरत।।२६।।

शिरून सत्वर तुमचे मुखांत।
काही अडकले भेसूर दाढांत।
शिरें ठेचूनि अन्य पावले अंत।
दिसते आहे सर्वच मज सांप्रत।।२७।।

जसे नद्यांचे प्रवाह अव्याहत।
वेगे जाती धावत जलधीत।
तसेच तुमच्या वदनी ज्वलंत।
महान योध्दे शिरती समस्त।।२८।।

झडप घालुनी ज्योतीवर।
पतंग मरती भराभर।
तसेच तुमचे मुखांतर।
गाठती, सर्व लोक सत्वर।।२९।।

मुखे आपुल्या प्रज्वलित।
लोकांस गिळले समस्त।
स्वतेजे व्यापूनी हे जगत।
दाहक तेजे तुम्ही व्यक्त।।३०।।

देवाधिदेवा सांगा आपण?।
भयाणरूपी तुम्ही कोण?।
नमितो मी, तुम्ही व्हा प्रसन्न।
सांगा तुमचे मला प्रयोजन?।।३१।।

श्री भगवान म्हणाले :

लोकांतक मी काळ पूरातन।
उभा इथे मी करावया हनन।
युध्दास सज्ज हे अवघे जन।
तुझ्याविना ते जातील संपून।।३२।।

उठ आता तू छेड युध्द म्हणून।
उपभोग राज्य तू शत्रूला जिंकून।
सर्वांस टाकीले आधीच मी मारून।
निमित्त हो तू केवळ, हे अर्जुन !।।३३।।

भीष्म, द्रोण, जयद्रथास।
कर्णादिक अन्य वीरांस।
मारिले मी आधीच सकळांस।
तुझाच जय, तू मार पुन्हा त्यांस।।३४।।

संजय म्हणाला :

ऐकून हे वचन साद्यंत।
अर्जुन झाला भयकंपीत।
भगवंतांस जोडूनी हात।
स्वरात वदला सद्‌गदित।।३५।।

अर्जुन म्हणाला :

नामश्रवणे तुमच्या युक्त।
प्रेमे होते जग हर्षित।
धाकें राक्षस पळतात।
सिध्दादिक सारे नमितात।।३६।।

का न वंदिती तुम्हास महात्मन।
देवेश्र्वरा तुम्ही थोर ब्रह्माहून।
सत्-असत्, अन्, विश्र्वसदन।
परम, अनंता तुम्ही सनातन।।३७।।

आदिदेव तुम्ही, हे परमेश्र्वर !।
पुरूषपुरातन जगताधार।
तुम्ही जाणता मोक्ष-धाम थोर।
अनंत-रूपा करिता विश्र्व-विस्तार।।३८।।

तुम्ही अग्नि, जल, यम, समीर।
प्रपितामह, ब्रह्मा, सुधाकर।
तुम्हास नमितो हजारवार।
नमस्कार करितो वारंवार।।३९।।

समोर, मागे, सभोवार।
तुम्हास माझा नमस्कार।
उत्साह, शक्ती, तुमची अपार।
सर्वात्म तुम्ही सर्वाधार।।४०।।

बरोबरीचा मित्र मानून।
साद घातली 'कृष्ण', 'सख्या' म्हणून।
महिमा तुमचा न जाणून।
चुकून घडले उल्लंघन।।४१।।

खेळता, निजता, बसता, खाता।
जनी, एकांती, विनोद करता।
अपमानित केले अजाणता।
म्हणून प्रार्थितो क्षमा अच्युता।।४२।।

जनक जगाचा चराचर।
गुरूंस तुम्ही पूजनीय, थोर।
त्रिलोकी न कोणा तुमची सर।
अनुपम तुम्ही खरोखर।।४३।।

प्रणिपात माझा म्हणून तुम्हास।
क्षमा करा, हे जगन्निवास !।
जसा क्षमितो पिता लेकरास।
सखा सख्यास वा प्रिय प्रियास।।४४।।

पाहून अपूर्व रूप जाहलो धन्य।
मन माझे परी झाले भयजन्य।
विनंती कृपया माझी करावी मान्य।
पुन्हा दाखवा रूप मला ते सामान्य।।४५।।

किरीट, गदा, चक्रधारी।
रूप पहाया इच्छाभारी।
चतुर्भुज ते रूप मुरारी।
पुन्हा दाखवा सामोरी।।४६।।

श्री भगवान म्हणाले :

प्रसन्न होऊन तुझेवर।
तुला दाविले विश्वरूप थोर।
तेजोमय, आद्य जे अपार।
कोणी न पाहिले आजवर।।४७।।

करूनी पूण्यकर्म, वेदाध्ययन।
उग्र तपस्या, यज्ञ अथवा दान।
भौतिक जगती तुजवाचून।
शक्य न कोणा रूपात या दर्शन।।४८।।

नको होऊ भ्रांतिनें व्यथित।
रूप पाहून भयाण अत्यंत।
भय-क्लेशातून होऊन मुक्त।
पहा रूप ते पूर्वस्थित।।४९।।

संजय म्हणाला :

असे बोलून भगवंत।
धीर द्यावया पार्था भयभीत।
शांत, मनोरम रूपांत।
प्रकट जाहले क्षणात।।५०।।

अर्जुन म्हणाला :

सौम्य मानवी रूपांत।
तुम्हास पाहून, हे अच्युत !।
आता होऊन शांतचित्त।
सावध झालो पूर्वस्थित।।५१।।

श्री भगवान म्हणाले :

जे रूप आता तू पाहिलेस।
दुष्कर फार ते पाहण्यास।
त्या रूपदर्शना उत्कंठित।
देवही करिती सायास।।५२।।

उग्र तपस्या, दानासहित।
वेदाभ्यासे, पूजनें तद्वत।
पाहणे मज अशक्य, हे भारत!।
पाहिलेस मजला तू यद्वत।।५३।।

अनन्य भक्तीनें, हे भारत!।
शक्य माझे दर्शन साक्षात।
हाच केवळ धरिता पथ।
प्रवेश खरा तो माझ्यांत।।५४।।

मम कर्मात जो असे रत।
भक्तीनें भरला नितांत।
निर्वैर, सर्वसंग वर्जित।
मिळतो मजला तो निश्चित।।५५।।

**अध्याय ११ संपन्न**

# ।।अध्याय बारावा।।

## भक्ती योग

**अर्जुन म्हणाला :**

पूजती जे नित्य रूप सगुण।
अन् भजती जे अक्षर निर्गुण।
थोर उभयांतील या कोण?।
मला सांगा देवा आपण।।१।।

**श्री भगवान म्हणाले :**

चित्त दंगले माझ्यांत।
सदा रंगले ध्यानात।
नितांत श्रद्धाभारित।
थोर योगी ते माझे मत।।२।।

अचल, अचिंत्य, निराकार।
सकल-व्यापी जे निर्विकार।
उपासती परि ते अक्षर।
समत्व बुध्दीनें निरंतर।।३।।

इंद्रिये अंकित ठेवती।
समभावे सर्व लेखती।
विश्र्व-हितार्थ जे झटती।
मला येऊनी ते मिळती।।४।।

अव्यक्तीं गढता चित्त।
क्लेश भोगती अत्यंत।
अव्यक्ता करिती प्राप्त।
महायत्ने देहवंत।।५।।

सर्व कर्मे मज अर्पून।
मत्परायण भक्तजन।
अनन्यभावे मज चिंतून।
करिती माझे पूजन।।६।।

मजपाशी नेमून आपुले मन।
भक्तीत माझ्या होऊन तल्लीन।
माझेच करिती केवळ जे ध्यान।
तोडितो शीघ्र मी त्यांचे भवबंधन।।७।।

माझेठायी ठाम ठेव तव मन।
ठेव बुध्दी तू तशीच, हे अर्जुन !।
होशील मग तू ममठायी विलीन।
निःशंक जाण तू हे माझे वचन।।८।।

दुष्कर झाले चित्त ठेवणे स्थिर।
तर मग योगाभ्यास तरी तू कर।
आचरूनी माझे वचनानुसार।
मम प्राप्तीची इच्छा मग तू धर।।९।।

असाध्य वाटला जर अभ्यास।
माझे कामी कर तू सायास।
एवढेच जरि तू केलेस।
सिध्दिस जाईल तव आस।।१०।।

मम भक्तीत राहूनी दंग।
जरी न घडला कर्मसंग।
पूर्ण बांधूनी तरी चंग।
काढ कर्मफलांतून संग।।११।।

यत्न थोर ज्ञानाहून।
ज्ञानाहून ते ध्यान।
फलत्याग ध्यानाहून।
शांती लाभे त्यागातुन।।१२।।

अजातशत्रू, मनी दयाभाव।
ममत्व नाही, तसा अहंभाव।
सुख-शोकी ठेवी समभाव।
मनी वागवी सदा क्षमाभाव।।१३।।

संतुष्ट योगी जो सदोदित।
दृढव्रती, संयमी तद्वत।
अर्पी मन-मती मम भक्तीत।
मज भक्त प्रिय तो अत्यंत।।१४।।

लोकसंग्रही निरामय।
ज्यास लाभतो लोकाश्रय।
हर्ष नसे ना चिंता, भय।
तसाच तोही मला प्रिय।।१५।।

ज्यास न उरली काही आस।
निश्चिंत, शुद्ध जो दक्ष, उदास
फलप्राप्तीस करी न सायास।
मानितो प्रिय मी त्या भक्तास।।१६।।

हर्ष नसे वा खंत।
निरीच्छ नित्य तद्वत।
शुभाशुभातून जो मुक्त।
मला आवडे तो भक्त।।१७।।

शत्रू, सोबती सम मानितो।
शीतोष्ण, सुख-शोक जसे लेखितो।
मानापमानीही तसे वागतो।
मज भक्त असा तो आवडतो।।१८।।

निंदा-स्तुती जो सम लेखितो।
मिळेल जे, ते गोड मानितो।
निराश्रय, मौनी ठाममनी तो।
भक्तीवान मज आवडतो।।१९।।

जसे वर्णिले, हे अर्जुन !।
धर्म-सार ते मज लक्षून।
सश्रध्द करिती जे पालन।
प्रिय अति मज ते भक्तजन।।२०।।

**अध्याय १२ संपन्न**

## ।। अध्याय तेरावा ।।

### क्षेत्र क्षेत्रज्ञ विभाग योग

अर्जुन म्हणाला :

कृष्णास वदला अर्जुन।
क्षेत्र तद्वत क्षेत्रज्ञ।
ज्ञेय आणिक ज्ञान।
घेऊ इच्छितो मी जाणून।।

श्री भगवान म्हणाले :

कृष्ण वदले, हे अर्जुन !।
देहास "क्षेत्र" संबोधन।
ज्यास असते हे ज्ञान।
त्यास म्हणती क्षेत्रज्ञ।।१।।

सर्व देहांत, हे अर्जुन !।
मीच देहज्ञ असे मान।
देह, देहज्ञ आकलन।
अनुमाग माझे, तो ज्ञान।।२।।

क्षेत्र कोठले कसे कोण।
कसे त्याचे परिवर्तन।
क्षेत्रज्ञही तो कसा कोण।
संक्षिप्त करितो वर्णन।।३।।

ऋषींनी अनेक छंदांत।
वर्णूनी वैदिक सूत्रांत।
कार्य-कारण सिध्दांत।
सप्रमाण केले प्रस्तुत।।४।।

भूतपंचक तसा अहंकार।
तशी बुध्दी, अव्यक्त मुलाधार।
दशेंद्रिये, पंचेंद्रियगोचर।
नित्य घडविती नानाविकार।।५।।

सुखासुख, इच्छा, मत्सर।
चेतना, धैर्य हे विकार।
वसती देही जे निरंतर।
तुज सारांशे केले सादर।।६।।

निरहंकार, अहिंसा, विनम्रता।
सहनशीलता अन् सहिष्णुता।
सरळता, गुरूसेवा, शुचिता।
मनोजय तशीच ती स्थिरता।।७।।

विषयांठायी असंग।
निरहंकारी अभंग।
जन्म, मृत्यु, जरा रोग।
यांत जाणणे गुण, व्यंग।।८।।

स्त्री, पुत्र, गृहादिकांत।
अलिप्तता ती अखंडीत।
प्रिय-अप्रिय लाभांत।
संकटीही समचित्त।।९।।

सदैव माझी अनन्य भक्ती।
एकांतवासी उत्कट प्रीति।
अप्रिय सामान्य-जन संगती।
ज्ञान द्योतक गुण असती।।१०।।

निरंतर ते आत्मज्ञान।
परमसत्यार्थ तत्वज्ञान।
म्हणती सकळ हे ज्ञान।
शिवाय या सर्व अज्ञान।।११।।

करितो आता ज्ञेय वर्णन।
जेणे होईल अमृतपान।
अनादिब्रह्म हे ममाधीन।
सत् असत् जे सनातन।।१२।।

सर्वत्र ज्यास मुखे, उदरे।
हस्त, पाद, नेत्र, कर्ण, शिरे।
सर्वलोक जे व्यापून उरे।
परम तत्व ते जाण खरे।।१३।।

इंद्रियगुणांचा मूल स्त्रोत।
तरी असे तो इंद्रियातीत।
सर्वाधार आसक्तीरहित।
गुण भोगूनही गुणातीत।।१४।।

आंत आणिक बाहेर।
व्यापिले हे चराचर।
समीप असोनी भासे दूर।
त्या सूक्ष्माची जाणीव दुष्कर।।१५।।

सर्व भूतांत अविभक्त।
जरी भासले, विभक्त।
पाळी जे सर्व जीवजात।
स्वये निर्मी, घडवी अंत।।१६।।

ज्योतींतील ते ज्योत।
अव्यक्त ते तमातीत।
ज्ञान, ज्ञेय ते निश्चित।
सर्व चित्ती अधिष्ठीत।।१७।।

क्षेत्र आणिक ज्ञान।
संक्षिप्त केले वर्णन।
भक्त माझा जे जाणून।
मम भावी जाई मिळून।।१८।।

पुरूष आणिक प्रकृती।
अनादि दोन्ही असती।
त्रिगुण, विकार निर्मिती।
करिते भौतिक प्रकृती।।१९।।

कार्य-कारणास कारण।
भौतिक प्रकृती जाण।
सुखदुःख भोग निर्माण।
पुरूष करि आपण।।२०।।

प्रकृतीत मांडून ठाण।
जीव भोगितो तिचे गुण।
गुण-संगच तो कारण।
शुभाशुभ जन्मा जाण।।२१।।

तरिही या देहांत।
दिव्य भोक्ता अतिरिक्त।
तो साक्षी भगवंत।
परम पुरूष जो ज्ञात।।२२।।

पुरूष, प्रकृती, गुण।
ज्यास झाले यांचे ज्ञान।
प्रपंची कसाही वर्तुन।
तो न जन्मे परतुन।।२३।।

आत्म्यास पाहती कोणी।
ध्यानें निज अंतःकरणी।
ज्ञान-योगे तसे आणि।
कर्म-योगे अन्य कोणी।।२४।।

आणिक जे अज्ञानी असती।
थोरांस ऐकून उपासती।
श्रध्दापूर्वक जे ऐकती।
त्या योगे ते मृत्यु जिंकिती।।२५।।

जगी होतसे उत्पन्न।
चराचर जे जे म्हणून।
क्षेत्र-क्षेत्रज्ञ मीलन।
घडवून आणि, हे अर्जुन !।।२६।।

समान सर्वभूतीं नश्वर।
राही अक्षय परमेश्वर।
असे पाहतो पार्था जो नर।
तोच डोळस खरोखर।।२७।।

सर्व सम ईश उपस्थिती।
अशीच ज्याची मनस्थिती।
त्याची न होता अधोगती।
त्यास लाभते परमगती।।२८।।

सर्व कर्मे नित्य करितो।
स्वये आपण निसर्ग तो।
आत्म्यास अकर्ता जाणतो।
असे पाही जो, तो पाहतो।।२९।।

वेगवेगळे भूत प्रकार।
परि एकच मूलाधार।
त्याचा जाणता विस्तार।
ब्रह्मत्व लाभते खरोखर।।३०।।

अनादि तद्वत शाश्वत।
परमात्मा जो गुणातीत।
अकर्ता राहुन देहात।
असे नित्य तो अलिप्त।।३१।।

जसे सर्वव्यापी गगन।
सूक्ष्मत्वे न होई मलीन।
सर्व देह तसा व्यापून।
आत्मा राही नित्य पावन।।३२।।

जसा एकटा सूर्य देव।
आत्मतेजे उजळी विश्व।
तसाच तोही एकमेव।
सर्व देह उजळी जीव।।३३।।

क्षेत्र-क्षेत्रज्ञातील हा भेद।
जे समजती निर्विवाद।
भूत-प्रकृती लंघून भेद।
अंती पावती ब्रह्मपद।।३४।।

**अध्याय १३ संपन्न**

## ।।अध्याय चौदावा।।

### *गुणत्रयविभाग योग*

श्री भगवान म्हणाले :

सर्व ज्ञानांत उत्तम ज्ञान।
पुन्हा करितो तुज कथन।
जाणून जे सर्व मुनीजन।
परमपदी झाले पावन।।१।।

या ज्ञानाचा आश्रय घेती।
समान माझे ते होती।
सृजन-काळी न जन्मा येती।
लय काळीही भंग न होती।।२।।

ब्रह्मरूप भौतिक योनी।
सकळ भूतांची जननी।
पेरितो बीज मी त्या स्थानी।
भूतें जन्मती त्यापासुनी।।३।।

जन्म समस्त योनींत।
अनेक भूतें घेतात।
माय प्रकृती त्यांत।
बीजदाता मी तात।।४।।

सत्व, रज, तम हे त्रिगुण।
प्रकृतीतून झाले उत्पन्न।
देहांत जखडती ते जाण।
पार्था, अव्ययी तो प्राण।।५।।

त्यांत निर्मळ, निरामय।
सत्वगुण जो तेजोमय।
ज्ञान सुखसंगा अक्षय।
बांधून टाकी अतिशय।।६।।

विषयात्मक तो रजोगुण।
भोग, लालसा करितो निर्माण।
जीवास करूनी कार्य-प्रवण।
त्यास जखडीतो हे जाण।।७।।

अज्ञानोत्पन्न तमोगुण।
सर्व भूतें मोही जाण।
आळस, निद्रा, विस्मरण।
यांत गुंतवी तो प्राण।।८।।

सत्व बांधी सुखात।
रजोगुण तो कर्मात।
ज्ञान करूनी अवगुंठीत।
तम बांधी प्रमादात।।९।।

रज-तमावर कधी सत्वाची मात।
सत्व-तमाचा कधी रज करी निःपात।
जिंकी तम कधी दोघांस उर्वरित।
चाले अशी नित्यही चुरस तिघांत।।१०।।

समस्त देहेंद्रियांत।
ज्ञान होते प्रकाशित।
तेंव्हा होतसे प्रतीत।
सत्व झाले वृध्दींगत।।११।।

कर्मारंभ, लोभ, प्रवृत्ती।
अशांती आणिक अतृप्ती।
जेंव्हा देही फाजील उठती।
रज वाढते तदा अति।।१२।।

निष्क्रियता, अंधःकार।
मोह, मूर्खता, विकार।
देहांत माजती फार।
तेंव्हा होई तम कहर।।१३।।

सत्व असता वृध्दींगत।
झाला जर देहान्त।
मिळे जन्म शुभलोकांत।
ज्ञात्यांच्या सहवासात।।१४।।

रजोवृध्दीत जो मरतो।
कर्मसंक्तांत तो जन्मतो।
तमोगुणात जो मरतो।
मूढ योनींत तो जन्मतो।।१५।।

सात्विक कर्माचे फल।
पुण्य आणिक निर्मल।
दुःख रजोगुणी फल।
मूढता फळ तमातील।।१६।।

सत्वातून उपजे ज्ञान।
लोभ उपजे रजातून।
प्रमाद, मोह, अज्ञान।
उपजती ही तमातून।।१७।।

सात्विक जाती स्वर्गास।
मानवलोकी राजस।
अधोगतीला तामस।
घडे स्व-गुणे हा वास।।१८।।

दुजा न कर्ता गुणाविन।
निर्गुण आत्मा तो पावन।
ज्यास लाभले हे ज्ञान।
मभ्दावी तो होई विलीन।।१९।।

देहातील हे गुण तीन।
समर्थ होई जो लंघून।
जन्म-मृत्यु, जरा जिंकून।
मोक्षास जाई तो मिळून।।२०।।

अर्जुन म्हणाला :

गेला लंघून हे त्रिगुण।
काय तयाचे लक्षण।
तसेच वर्तनाचरण।
करू इच्छितो मी श्रवण।।२१।।

श्री भगवान म्हणाले :

प्रकाश, मोह, प्रवृत्ती।
असता यांची उपस्थिती।
ठेवित नाही मत्सर-वृत्ती।
धरी न लोपता, आसक्ती।।२२।।

उदासीनासम राहतो।
कधी गुणांनी ना ढळतो।
त्रिगुण-कर्मे जो जाणतो।
अढळ नित्य तो असतो।।२३।।

सम सुख-दुःखी आत्मस्थित।
तो कांचन, माती, दगडात।
प्रियाप्रियात, स्तुती-निंदेत।
समत्व ठेवी धैर्यवंत।।२४।।

सम लेखी मान-अपमान।
मित्र-शत्रूशी वागे समान।
भौतिक कर्मे देई सोडून।
'गुणातीत' तो, म्हणती जन।।२५।।

अनन्य भक्तीनें अखंडित।
धरितो माझे सेवा-व्रत।
होऊन मग तो गुणातीत।
उन्नत होई ब्रह्माप्रत।।२६।।

आधार जसा मी ब्रह्मास।
तसा अवीट सुधेस।
आधार शाश्वत धर्मास।
आणिक नितांत सुखास।।२७।।

**अध्याय १४ संपन्न**

## ।।अध्याय पंधरावा।।

### *पुरूषोत्तम योग*

श्री भगवान म्हणाले :

वरून मुळे शाखा खालून।
वेद-पर्णी वड सनातन।
ज्यास असे या रूपाचे ज्ञान।
त्यास म्हणती वेदज्ञ म्हणून।।१।।

पसरल्या शाखा खाली-वर।
गुणे पोसला पल्लव-भार।
होई खालीही मूळ-विस्तार।
कर्म-बध्द जो धरतीवर।।२।।

रूप यासम नसे जगात।
ठाऊक नाही आरंभ-अंत।
वृक्ष दृढ-मूल हा अत्यंत।
असंग-शस्त्रे छाटावा खचित।।३।।

शोधावे मग असे स्थान।
परत न येणे जेथून।
परम आद्य ज निधान।
वसतो जेथे भगवान।।४।।

अभिमान, मोहातुन नित्य मुक्त।
संग-दोष रहित जे सदोदित।
सुख-दुःख, द्वंद्वातून जे विभक्त।
जाती नित्य पदी ते ज्ञानवंत।।५।।

सूर्याग्नि न जे उजळू शकती।
मग चंद्रप्रभेची काय स्थिती।
ते धाम असे मम जे पावती।
कधी न तेथून मागे फिरती।।६।।

अंश माझा शाश्वत।
जीव, जीवलोकांत।
चित्त पंचेंद्रियांसहित।
ओढितो प्रकृतीकृत।।७।।

सोडी, धारि, कलेवर।
यांचे सोबत ईश्वर।
जसा गंध निरंतर।
घेऊन जाई समीर।।८।।

त्वचा, रसना, कान।
नेत्र, नाक तसे मन।
सर्वांस या अधिष्ठून।
विषय करितो सेवन।।९।।

धारिता, सोडिता देहास।
कसा भोगितो विषयास।
कळे न परि जे मूढांस।
ज्ञानी जाणती जे डोळस।।१०।।

यत्ने दिसतो योग्यांस।
निजांतरी त्याचा वास।
परि यत्नेही मूढांस।
अशक्य पाहणे त्यास।।११।।

सूर्यतेज जे जगी भासे।
चंद्रप्रभा जी नभी विलसे।
दाह अग्निचा जाळीतसे।
माझेच सर्व ते तेज असे।।१२।।

होऊन प्रकट मी धरेवर।
जीव धारितो आत्म-बळावर।
होऊन मी रसरूप सुधाकर।
वनस्पतींस मी जीवनाधार।।१३।।

जठराग्नी मी स्वये होऊन।
भूत-देही विराजमान।
सम करूनी प्राणापान।
पचवितो मी चतुर्विध अन्न।।१४।।

समस्त हृदयी करितो निवास।
देतो स्मृती, ज्ञान, विस्मृतीही त्यांस।
वेद्य जाण मी अवघ्या वेदांस।
वेदकर्ता, मीच जाणतो वेदांस।।१५।।

पुरूष जगी असती दोन।
क्षराक्षर असे दोघेजण।
भूतवर्ग तो क्षर म्हणून।
कूटस्थ तो अक्षर जाण।।१६।।

उत्तम या दोघांहून।
सनातन तो भगवान।
व्यापून जो हे त्रिभूवन।
करितो त्याचे पालन।।१७।।

मी असे क्षरातीत।
अक्षराहूनी उन्नत।
म्हणून लोकीं, वेदांत।
"पुरुषोत्तम" मी ख्यात।।१८।।

निःसंदेह जाणतो जो कोण।
मीच पुरुषोत्तम भगवान।
सर्व भावे मज उपासून।
भक्तीत माझे जाई रंगून।।१९।।

शास्त्र असे हे अति गहन।
अनघा केले तुज कथन।
हे जाणून जो होईल बुध्दिमान।
कृतार्थ होईल त्याचे जीवन।।२०।।

**अध्याय १५ संपन्न**

## ।।अध्याय सोळावा।।

### दैवासुर संपद्विभाग योग

श्री भगवान म्हणाले :

निर्भयता, सात्विक मन।
योगज्ञानी अनुशीलन।
स्वाध्याय, सरळता, दान।
तपोयज्ञ, स्व-संयमन।।१।।

अक्रोध, अहिंसा, सत्यता।
त्याग, शांती, मृदुता।
भूतदया, निर्लोभता।
सौम्यता, स्थैर्य, नम्रता।।२।।

उत्साह, धैर्य, शुचिता।
अद्रोह, क्षमा, नम्रता।
लाभती हे गुण भारता।
दिव्य स्वभावी जन्मता।।३।।

अज्ञान, दंभ, अहंता।
क्रोध, गर्व, कठोरता।
लाभती हे गुण भारता।
आसुर स्वभावी जन्मता।।४।।

गुण दैवी मोक्षदायक।
आसुरी गुण बंधनात्मक।
नकोस पार्था करू शोक।
दैवी गुणांचा तू मालक।।५।।

दैवी, आसुरी म्हणून।
भूतवर्ग जगी दोन।
दैवी केले मी कथन।
आसुरी आता घे जाणून।।६।।

कार्याकार्य न जाणती।
आसुरी ज्यांची प्रवृत्ती।
सत्याचार, शुचिता वृत्ती।
त्यांचे ठायी न आढळती।।७।।

जग असत्य निराधार।
म्हणती नाही परमेश्वर।
काम-मूलक हा संसार।
नसे कोठला सहकार।।८।।

स्वीकारून असा अविवेक।
नष्टात्मे, अल्पमती लोक।
आचरूनी कर्मे हिंसक।
जगास ठरती घातक।।९।।

अपूर्त वासने सहित।
दांभिक, गर्वी, मदमत्त।
अनिष्ट विचारे मोहित।
पापाचरणी सदा रत।।१०।।

चिंता करिती नित्य अति।
केवळ सरे जी देहांती।
करणे कामेच्छा तृप्ती।
हेच सर्वस्व मानिती।।११।।

आशा पाशांत गुंतून।
काम-क्रोध परायण।
कराया विषयसेवन।
अन्याये जोडिती धन।।१२।।

आज मिळविले मी हे धन।
मनोरथ मी हे साधीन।
हे माझे, इतःपर होईन।
अधिकाधिक मी धनवान।।१३।।

यास दाविले यमसदन।
अन्य रिपूंस मी मारिन।
स्वामी, भोगी, मी भगवान।
सुखी, सिध्द मी बलवान।।१४।।

धनवान मी कुलवान।
नसे कोणी मज समान।
यज्ञ, दान, मौज मी करिन।
इति वदती अज्ञजन।।१५।।

भ्रांत चित्त सदोदित।
अडकले मोह जालात।
आसक्त भोग तृप्तीत।
जाती गलिच्छ नरकात।।१६।।

गर्विष्ठ, आत्म-तुष्टीत।
मदांध, धन-मानात।
यज्ञोपचार करितात।
नसती जे शास्त्र-संमत।।१७।।

अहंकार, बल, गर्वात।
काम-क्रोधे उन्मत्त।
ते निज-पर देहांत।
द्वेष माझा करितात।।१८।।

अधम, क्रूर, मत्सरी।
असे नर दुराचारी।
नित्य त्यांस मी संसारी।
टाकितो योनींत आसुरी।।१९।।

आसुरी योनींत जन्मती।
पुन्हा पुन्हा ते मूढमती।
मिळता न मला पावती।
आणखीच ते अधोगती।।२०।।

काम, क्रोध, हव्यास।
कारण आत्म-नाशास।
त्रिविध ही नरकाची वेस।
यास्तव टाळावे तीस।।२१।।

त्रय तमद्वारें दुष्कर।
जो टाळून सुटला नर।
तो स्व-मंगल मार्गावर।
प्राप्त करितो गति थोर।।२२।।

सोडितो जो शास्त्र-विधींस।
स्वैर आचरी कर्मास।
मुकून जाई तो सिध्दि, सुखास।
तसा अंतरे थोर गतिस।।२३।।

कार्याकार्यास प्रमाण।
शास्त्र-विधी वचन।
यद्वत शास्त्र विधान।
तसे ठेवी कर्माचरण।।२४।।

अध्याय १६ संपन्न

# ।।अध्याय सतरावा।।

## श्रध्दात्रय विभाग योग

अर्जुन म्हणाला :

जे न पाळता विधी-वचन।
निज-श्रध्देनें करिती पूजन।
जाणावे ते सात्विक म्हणून।
की राजसी वा तामसी जन ?।।१।।

श्री भगवान म्हणाले :

प्रकार असती श्रध्देचे तीन।
निश्चित होती संस्कारातून।
सात्विक, राजस, तमोगुण।
करितो आता तुज वर्णन।।२।।

पार्था, प्रकृतीगुणाधिन।
घडे पुरूष आपण।
जसे ज्याचे श्रध्दास्थान।
घडे तसाच तो जाण।।३।।

देवां पूजती सात्विक।
राक्षसांसी राजसिक।
पूजती भूत-प्रेतादिक।
जे स्वभावे तामसिक।।४।।

दंभ, अहंतायुक्त।
तप करिती अशास्त्रोक्त।
काम-क्रोधे बलसक्त।
तामसी होती उन्मत्त।।५।।

असती जे मूढमती।
देह-तत्वे कष्टविती।
अंतर्यामी मज पीडिती।
त्यांस आसुर म्हणती।।६।।

प्रकार अन्नाचे तीन।
तशाच असती रूची भिन्न।
तरोच यज्ञ, तप, दान।
भेद त्यांतील करि श्रवण।।७।।

आयु, सत्व, बलवर्धक।
सुख, स्वास्थ्य, हर्षवर्धक।
रसाळ, स्निग्ध, पौष्टीक।
आहारप्रिय, तो सात्विक।।८।।

कडू, आम्ल, खारट, शुष्क।
अत्युष्ण, तिखट, दाहक।
दुःख, शोक, रोगवर्धक।
आहारप्रिय, राजसिक।।९।।

गार, शिळे, रस-हीन।
बेचव, उष्टे, मलिन।
अमंगल ते भोजन।
प्रिय तामसा जाण।।१०।।

फलवासनेतून मुक्त।
कर्तव्यानें विधियुक्त।
करितो यज्ञ जो भक्त।
यज्ञ सात्विक तो प्रोक्त।।११।।

मनी फलेच्छा धरून।
आत्म-प्रतिष्ठा म्हणून।
जो यज्ञ करिती जन।
यज्ञ राजस तो जाण।।१२।।

विधी, मंत्र, श्रध्दाहीन।
प्रसाद, दक्षिणेवाचून।
जो यज्ञ करिती जन।
यज्ञ तामस तो जाण।।१३।।

देव, ब्राम्हण, गुरू पूजन।
ब्रह्मचर्य, अहिंसा पालन।
शुचिता, ऋजुता संपन्न।
शारीरिक ते तप जाण।।१४।।

वाचा प्रिय, हितकारक।
असत्य नाही वा खोचक।
वेदाभ्यासी रत साधक।
तप म्हणती ते वाचिक।।१५।।

प्रसन्न चित्त, कोमलता।
संयम आणि गंभीरता।
नित्य मानसी शुचिता।
तप मानस ते भारता।।१६।।

फलवासना रहित।
उत्कट श्रध्देसहित।
त्रिविधा तप निश्चित।
सात्विक ते विदित।।१७।।

व्हावा आदर सत्कार।
म्हणून दंभे करिती नर।
क्षणैक जो तपोपचार।
तप राजस ते अस्थिर।।१८।।

पेटून दुराग्रहास।
पिडून आत्म-देहास।
लक्षिती पर-घातास।
जाण तप ते तामस।।१९।।

कर्तव्य आपुले म्हणून।
उपकार न अपेक्षून।
सत्पात्री, स्थळी, काळी, दान।
जाण सात्विक ते दान।।२०।।

प्रत्युपकार अपेक्षून।
वा फलवासना ठेवून।
सखेद देई यजमान।
म्हणती राजस ते दान।।२१।।

स्थळी, काळी, पात्री अनुचित।
तुच्छ लेखूनी अभ्यागत।
अनादरानें देतात।
दान तामस ते ज्ञात।।२२।।

शब्द ॐ, तत्, सत् तीन।
परब्रह्माचे संबोधन।
त्यांतून काळी पुरातन।
निर्मिले वेद, यज्ञ, ब्राह्मण।।२३।।

म्हणून सारे ब्रह्मजन।
'ॐ' कार आधी उच्चारून।
शास्त्रोक्त होम, तप, दान।
नित्य करिती प्रवर्तन।।२४।।

निष्काम ठेवूनी मन।
'तत्' कार उच्चारून।
करिती होम, तपोदान।
मोक्षार्थी मोक्ष लक्षून।।२५।।

'सत्'कार संबोधन।
सभ्दाव, साधु दर्शन।
तद्वत कर्मी पावन।
'सत्' शब्द प्रयोजन।।२६।।

होमीं, तपीं, दानीं स्थिती।
म्हणती ती 'सत्' इति।
त्यांस पूरक जी कृती।
तिही उक्त 'सत्' इति।।२७।।

कर्म, होम, तप, दान।
आरंभिता श्रध्देविण।
मिथ्या, व्यर्थची ती जाण।
द्वय लोकीं, हे अर्जुन !।।२८।।

**अध्याय १७ संपन्न**

## ।।अध्याय अठरावा।।

### *मोक्षसंन्यास योग*

अर्जुन म्हणाला :

अर्जुन वदला कृष्णास।
करा अरातो संन्यास।
त्यागही म्हणती कशास।
पूर्ण करावी मम आस।।१।।

श्री भगवान म्हणाले :

कामनाफळ त्यागास।
ज्ञाते म्हणती संन्यास।
सर्व कर्मफळ त्यागास।
त्याग बोलती विद्वांसं।।२।।

त्याज्य कर्मे दोषयुक्त।
म्हणती काही पंडीत।
परि यज्ञ, तप, दानात।
गैर न काही, दुजे मत।।३।।

तरी आता या विषयात।
ऐक माझे मत निश्चित।
त्याग ज्यास म्हणतात।
त्रिविधांगी तो घोषित।।४।।

यज्ञ, दान, तप कर्मे खचित।
न त्यागता, सर्व करावी नित।
आचरून कर्मे ही निश्चित।
ज्ञानवंतही होती शुचिर्भूत।।५।।

ममत्व, फलाशा रहित।
कर्मे नित्य ही करावीत।
अंतिम आणिक निश्चित।
जाण अर्जुना माझे मत।।६।।

त्याग कर्मांचा विहित।
कधी कुणा ना उचित।
मोहे सोडिता कर्मे नित।
त्याग तामस तो घोषित।।७।।

भिऊन देह-क्लेशास।
घेतसे कर्म-संन्यास।
अशा निष्फळ त्यागास।
म्हणती त्याग राजस।।८।।

कर्तव्य भावनेसहित।
फल-संगातून मुक्त।
कर्म करणे विहित।
त्याग सात्विक तो ज्ञात।।९।।

त्यागी आणिक बुध्दीमंत।
स्थित निरंतर सत्वांत।
राग, द्वेष, शंका रहित।
नित्य शुभाशुभ कर्मात।।१०।।

जीव जोंवर शरीरांत।
कर्म करणे क्रमप्राप्त।
कर्म फलातून जो मुक्त।
त्यागी त्यासच म्हणतात।।११।।

इष्ट, अनिष्ट, मिश्रित।
फळ कर्मांचे निश्चित।
अत्यागी भोगी होता मृत।
मुक्त ज्यांतून संन्यस्त।।१२।।

कर्मसिध्दी सकळीक।
घडवी कारण पंचक।
निष्कर्ष हा वैदिक।
सांगतो मी, तू ऐक।।१३।।

देह, कर्ता,अधिष्ठान।
इंद्रिये कर्मसाधन।
नानाविध क्रिया भिन्न।
पांचवे दैव कारण।।१४।।

काया, वाचा, मने, कृती।
नर जगी आरंभती।
योग्यायोग्य जे करिती।
त्यांत पंच हेतु असती।।१५।।

मनुष्य तेथे असंस्कृत।
स्वतःस मानी कर्ता निश्चित।
मूर्ख मानव तो खचित।
तत्वं न जाणी यत्किंचित।।१६।।

अहंकार मिथ्या नसे जयास।
मती जयाची न चिकटे फळास।
मारिले तयानें जरी लोकांस।
बंदी न तो, वा कारण घातास।।१७।।

ज्ञेय, ज्ञाता आणि ज्ञान।
कर्मप्रेरक हे तीन।
क्रिया, कर्तृत्व, साधन।
घटक कर्माचे तीन।।१८।।

कर्म, कर्ता आणि ज्ञान।
त्रिगुणी भेदले तीन।
विभिन्न ते गुणवर्णन।
यथार्थ तू, घे ऐकून।।१९।।

पाही समस्त भूतांत।
भाव एक शाश्वत।
अविभक्त विभक्तांत।
ज्ञान सात्विक ते ज्ञात।।२०।।

सर्व भूतांत जे ज्ञान।
भाव पाहते भिन्न।
राजसिक ते ज्ञान।
घे जाणून, हे अर्जुन !।।२१।।

कार्यी एकाच गुंततें।
तेच सर्वस्व मानते।
भावार्थ जे न जाणते।
जाण तामस ज्ञान ते।।२२।।

कर्म करणे विहित।
राग, द्वेष विरहित।
फलाशेतून जे मुक्त।
कर्म सात्विक ते ज्ञात।।२३।।

धरूनी फलेच्छा चित्ती।
दंभपूर्वक वागती।
महा-यत्ने आचरती।
कर्म राजस ते म्हणती।।२४।।

ठाऊक नसता कुवत, अंत।
जे कर्म, हानी, परक्लेश-युक्त।
आरंभ करिती मोहात।
तामस कर्म ते म्हणतात।।२५।।

निरहंकारी, संग-मुक्त।
पूर्णोत्साही धैर्ययुक्त।
यशापशयी समचित्त।
कर्ता सात्विक तो ज्ञात।।२६।।

अति कर्मफलेच्छासक्त।
लोभी, हिंसक, अशुचित।
आनंद-शोके विचलित।
कर्ता राजस तो घोषित।।२७।।

अस्थिर, हट्टी, प्राकृत।
मत्सरी, कपटी, सुस्त।
दीर्घ-सूत्री, खिन्न-चित्त।
कर्ता तामस तो ज्ञात।।२८।।

प्रकृतिचे गुणाधीन।
भेद बुध्दीचे तीन।
धृतिचेही तसे जाण।
ऐक त्यांचे विवेचन।।२९।।

कृती, निवृत्ती, उभय।
कार्याकार्य, भय, निर्भय।
बंध, मोक्ष करी निर्णय।
बुध्दी सात्विक ती होय।।३०।।

धर्म, अधर्म तो काय।
कार्याकार्य कसे काय।
नाही यथार्थ निर्णय।
बुध्दी राजस ती होय।।३१।।

म्हणे धर्म अधर्मास।
अंधारे घेरले जिस।
खोटा समजे खऱ्यास।
बुध्दी होय ती तामस।।३२।।

मन, इंद्रिये अन् प्राण।
यांचे करिते नियंत्रण।
दृढता करूनी धारण।
धृति सात्विक ती जाण।।३३।।

काम, धर्मार्थकारण।
निर्धारे करी धारण।
धरून फलेच्छा दारूण।
धृति राजस ती जाण।।३४।।

सोडी न निद्रा, भयास।
शोक, खेद व मदास।
दुर्बुध्दच या वृत्तीस।
म्हणती धृति तामस।।३५।।

ऐक आता, हे अर्जुन !।
प्रकार सुखाचे तीन।
अभ्यासे रमता मन।
दुःख जाई संपून।।३६।।

आरंभी भासे विषासम।
परि शेवटी सुधेसम।
प्रकटे आत्मबुध्दीतून।
सुखसात्विक ते मान।।३७।।

विषयेंद्रियीं संगम।
आधी भासे सुधेसम।
परि अंती विषासम।
सुख राजस ते मान।।३८।।

आधी, अंती जे मोहक।
भ्रम, सुस्ती, निद्रा पोषक।
सुख असे आत्म-घातक।
ते समजावे तामसिक।।३९।।

धरेवर वा स्वर्गात।
तद्वत देव लोकांत।
नसे कोणी प्राणी-जात।
तीन गुणांतून मुक्त।।४०।।

ब्राह्मणादिक वर्णांत।
कर्मे झाली विभाजित।
प्रकृतीगुणे समस्त।
जी स्वभावे जन्म-जात।।४१।।

संयम, शांती, शुचिता।
क्षमा, तप, धार्मिकता।
ज्ञान, सचोटी, विद्वत्ता।
द्विज-कर्म स्वभावता।।४२।।

शौर्य, कुवत, दक्षता।
धैर्य आणि रणधीरता।
औदार्य तथा उदात्तता।
कर्म क्षत्रिय स्वभावता।।४३।।

उदीम, गो-रक्षा, शंती।
वैश्य-कर्म-प्रकृती।
सहज सेवा-वृत्ती।
शूद्र-कर्म बोलती।।४४।।

रत जो निज कर्मात।
सिध्दी करितो तो प्राप्त।
मोक्ष लाभे स्व-कर्मात।
कसा ऐक, हे भारत !।।४५।।

जेथून झाला भूतोभ्दव।
विस्तार ज्याचा हे विश्व।
स्व-कर्मी पूजता तो देव।
सिध्दी पावतो मानव।।४६।।

धर्म आपला परधर्माहून भला।
जरी न भासे भला-चांगला।
स्व-भाव कर्मा जो गढला।
पाप न लागे कधी त्याला।।४७।।

निज कर्म स्वभावजात।
ते आचरावे सदोदित।
जरी असले दोषांकित।
जसा अग्नी धूम्रवेष्टीत।।४८।।

कुठे न राही आसक्त।
निस्पृह आणि जितचित्त।
निष्काम सिध्दी करी प्राप्त।
स्वये राहूनी संन्यस्त।।४९।।

करिता सिध्दी अशी प्राप्त।
कसा होतसे ब्रह्मीभूत।
ती ज्ञाननिष्ठा यथास्थित।
ऐक सांगतो संक्षिप्त।।५०।।

बुध्दीनें शुध्द होऊन।
धीरानें मन बांधून।
शब्दादि भोग सोडून।
द्वेष, आसक्ती जिंकून।।५१।।

एकांतवासी, मिताहारी।
काया, वाचा, मन आवरी।
सदैव ध्यान योगापरी।
वैराग्य दृढ आचरी।।५२।।

गर्व, अहंता, कुवत।
काम-क्रोध विरहित।
निर्मम तद्वत शांत।
ब्रह्मरूपास तो युक्त।।५३।।

ब्रह्मरूप तो प्रसन्नचित्त।
शोक तद्वत इच्छामुक्त।
सर्वाभूती समभावयुक्त।
मम दिव्य भक्ती करि प्राप्त।।५४।।

केवढा अन् मी कोण।
घेई भक्तीनें जाणून।
यथार्थ होता मम ज्ञान।
मत्स्वरूपी होई लीन।।५५।।

समस्त कर्मे जी करितो।
आश्रय तेथे माझा घेतो।
कृपा-प्रसादे मम पावतो।
धाम शाश्वत, अक्षय तो।।५६।।

मत्परायण होऊन।
सर्व कर्मे मज अर्पून।
बुध्दी-योग मग जोडून।
मत्पर ठेवी सदा मन।।५७।।

मजठायी ठेवूनी निज-चित्त।
मत्प्रसादे होशील भयमुक्त।
परि होशील जर अहंकृत।
विनाश होईल तव निश्चित।।५८।।

धरून चित्ती अहंकार।
म्हणशील नाही लढणार।
व्यर्थच तव तो निर्धार।
स्व-भावेच तू लढणार।।५९।।

जरी मोहानें देशी नकार।
तव स्व-भावी कर्म-संस्कार।
अस्वस्थच तूज करणार।
खचित मग तू लढणार।।६०।।

सर्व भूतीं परमेश्वर।
वास करितो निरंतर।
त्यांस नाचवी साचार।
जसे ठेविले यंत्रावर।।६१।।

सर्व-भावे, हे अर्जुन !।
त्यांस जावे तू शरण।
देईल तुज तो वरदान।
पद शांतीचे सनातन।।६२।।

गूढ गूढाहून असे ज्ञान।
कथिले तुज मी, हे अर्जुन !।
आता करूनी ते मनन।
ठेवी योग्य ते तव वर्तन।।६३।।

परमगूढ हे मम वचन।
परत परिस तू, हे अर्जुन !।
सखा प्रियतम मम म्हणून।
तव हितार्थ करितो कथन।।६४।।

सदैव माझे करूनी चिंतन।
कर माझे तू यजन, पूजन।
होशील मग तू ममठायी लीन।
मत्प्रिया, हे सत्य मम वचन।।६५।।

अवघे धर्म सोडून।
मलाच तू ये शरण।
शोक तुझा दे टाकून।
पापमुक्त मी तुज करीन।।६६।।

अभक्त आणि तपोहीन।
सेवाहीन, श्रवणेच्छाहीन।
मला देतसे जो दूषण।
त्यास न द्यावे हे ज्ञान।।६७।।

दिव्य भक्तीनें मम भक्तांत।
थोर गूढ हे राही सांगत।
मजपाशी तो येतो निश्चित।
यात संशय नाही किंचित।।६८।।

अन्य न कोणी सेवक।
प्रिय मला जो अधिक।
जगी न होणे आणिक।
प्रिय त्याहून कुणी एक।।६९।।

करील आमुचा जो पठण।
धर्म-संवाद हा पावन।
ज्ञान-यज्ञे मम पूजन।
तो करितो, मी समजेन।।७०।।

द्वेषमुक्त, श्रध्दायुक्त।
ऐकतो जो वचनोक्त।
होऊन तो पापमुक्त।
मिळतो शुभ-लोकांत।।७१।।

एकाग्र ठेवूनी मन।
केलेस का तू श्रवण?।
गेले ना मोह-अज्ञान?।
सांग मला, हे अर्जुन!।।७२।।

अर्जुन म्हणाला :

मजवरी होता तुम्ही कृपावंत।
मोह जाऊनी झालो सावधचित्त।
दृढ आता मी झालो संशयमुक्त।
पाळीन तुमचा शब्द आता निश्चित।।७३।।

संजय म्हणाला :

महान दोघे कृष्णार्जुन।
अद्‌भूत त्यांचे संभाषण।
राया करिता मी श्रवण।
सर्वांग गेले रोमांचून।।७४।।

झाली व्यासकृपा म्हणून।
अति गूढ हे योग-ज्ञान।
स्वये सांगता भगवान।
प्रत्यक्ष केले मी श्रवण।।७५।।

अद्‌भूत आणि पावन।
केशवार्जुन संभाषण।
पुन्हा पुन्हा ते स्मरून।
हर्षतो मी प्रतिक्षण।।७६।।

देवरूप अति अद्‌भूत।
जे आठवता मी सतत।
होऊन अधिक विस्मित।
होतो बहु मी आनंदीत।।७७।।

जिथे कृष्ण-योगेश्वर।
जिथे पार्थ-धनुर्धर।
तिथे जय-श्री, धर्म, बल थोर।
राजेश्वरा ! हे मत माझे स्थिर।।७८।।

**अध्याय १८ संपन्न**

*।। श्रीकृष्णार्पणमस्तु ।।*

**हरये नमः। हरये नमः। हरये नमः।**

## उत्तर-रंग

पाहून धनंजय, धनुर्धर।
शरचापसिध्द त्या रथावर।
गर्जुन त्याचा जयजयकार।
करिते झाले समस्त वीर।

## फलश्रुती

चातुर्य लाभे गीता ऐकून।
अभ्यासून गीता लाभे ज्ञान।
योगसिध्दी ती गीता जाणून।
मुक्तीस नेई गीता पालन।

।। ॐ तत् सत् इति ।।

# संदर्भग्रंथ सूची


(१) भगवद्‌गीता - कृष्णकृपामूर्ती
जशी आहे तशी ए.सी.भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद.

(२) सार्थ श्री ज्ञानेश्वरी - संपादक व अनुवादक
बाळकृष्ण अनंत भिडे.

(३) सॉंग सुप्रीम भगवद्‌गीता - जी.नारायणा.

(४) भगवद्‌गीता विथ संस्कृत टेक्सट्‌ - भाषांतरकार
स्वामी चिद्‌भावानंद.

(५) गीताई - विनोबा भावे.


********

